❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारितेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# धमकीवजा संदेश कोणासाठी?

## मोदीजी सुप्रीम कोर्टाला धमकावताहेत का? उद्धव ठाकरे यांचा सवाल

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला चढवला. जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी भेटायला मोदींना वेळ नाही. संसदेत यायला वेळ नाही. पण गद्दारांना भेटायला त्यांच्याकडे वेळ आहे. आणि मोदी महाशय या गद्दारांना सांगताहेत की, मी तुमच्या पाठिशी आहे. म्हणजे हा संदेश ते कोणाला देताहेत? सुप्रीम कोर्टाला धमकावताहेत का? असा सवाल करत उद्धव ठाकरे यांनी घणाघात केला.

गेल्या चार वर्षांपासून शिवसेना पक्षाच्या बाबतीतील प्रलंबित असलेल्या प्रकरणाची सुनावणी सुरू झालेली आहे. मी आजपर्यंत कधीही आणि यापुढेही हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने बोललेलो नाही आणि बोलणारही नाही. आमची साधी अपेक्षा अशी आहे की, संविधानाप्रमाणे निकाल दिला जावा आणि तो लागेल याची खात्री आहे न्यायालयाबद्दल आम्हाला पूर्ण आदर आणि विश्वास आहे. परंतु, सध्या देशामध्ये जे वातावरण आहे ते वातावरण पाहिल्यानंतर मला त्या वातावरणाबद्दल आणि ज्या काही घटना घडताहेत त्याच्याबद्दल बोलणं हे भाग आहे असं मला वाटतं. म्हणून आज मी आपल्याशी संवाद साधत आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.



एकूणच सध्या देशात राजकारणात सध्या मतलबी वारे सुरू आहेत. जे विरोधी पक्षातून सत्ताधारी पक्षात जातात त्यांना वाटतं विरोधी पक्ष थंड होतात. पण आम्ही थंड होणाऱ्यातले नाही. देशातली परिस्थिती पाहिली तर कमी दाबाचा पट्टा आता तयार झालेला आहे. आणि ही वादळापूर्वीची शांतता आहे असं एकूण चित्र या देशात आहे, असा थेट इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

गेले महिने-दोन महिने देशामध्येच नव्हे तर संपूर्ण जगात आपल्या तरुणाईने म्हणजे जेन-झीने आपल्या सरकारला कसं गुडघ्यावर आणलं याची चर्चा सुरू आहे. मला एका गोष्टीचं वैशम्य वाटतं की, या पिढीला आधार देण्याऐवजी त्यांच्यावर अत्यंत निर्घृणपणाने अत्याचार केले गेले. काहींना तर जालियनवाला बागेच्या हत्याकाडांची आठवण व्हावी, अशा पद्धतीने अत्याचार केले गेले. पण आठवण तर केलीच पाहिजे. लाठीला खिळे लावून मारले गेले. अश्रूधुर सोडले गेले. पॅलेट गनने त्यांच्यावर छरे मारले गेले. कुणाची डोकी फोडली कुणाचे पाय मोडले. अत्यंत वाईट पद्धतीने त्यांना ट्रोल करण्यात आलं. त्यांना देशद्रोही संबोधन्यात आलं. एवढं केल्यानंतर त्यांच्याबरोबर बोलण्याची पंतप्रधानांची तयारी नाहीये आणि त्यांच्याबरोबर बोलण्याची गृहमंत्र्यांची हिंमत नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. आज संपूर्ण विरोधी पक्ष आणि संपूर्ण देश पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडून उत्तर मागतंय. हे अत्याचार तुम्ही का केलेत आणि कशासाठी केलेत. एका मंत्र्याचा राजीनामा घेतला म्हणून हा प्रश्न काही सुटत नाही. तर संपूर्ण सरकार आता बदललं गेलं पाहिजे.. मधल्या काळात न्यायमूर्ती जामदार म्हणाले होते की, त्यांच्याकडे म्हणजेच भाजपकडे वॉशिंग मशीन आहे. कुणी किती गुन्हे करा, वॉशिंग मशीनमध्ये गेल्यानंतर ते धुतले जातात. आताही तोच मुद्दा आहे.

# सुनेत्रा पवारांच्या मार्गदर्शनात सुनील तटकरेंचं काम चांगलं

## प्रशांत किशोर भेटीनंतर दत्तात्रय भरणेंची प्रतिक्रिया

■ पुणे (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अंतर्गत राजी-नाराजी असून राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. तसेच, राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बदलण्याबाबत प्रशांक किशोर यांनी सल्ला दिल्याची देखील माध्यमांत चर्चा आहे. मात्र, या चर्चेवर राष्ट्रवादीतील नेते भूमिका मांडताना अशी कुठलीही चर्चा किंवा सल्ला कुणीही दिलेला नाही, असे सांगत आहेत. आता, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही या भेटीवर आपली प्रतिक्रिया दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष बदलाबाबत कोणतीही चर्चा नाही, असा कोणताही सल्ला दिलेला नाही. प्रशांत किशोर आणि अजित दादांचे संबंध चांगले होते, म्हणून ते भेटायला आले होते. कोणीतरी गैरसमजातून ही बातमी पसरवत आहे. सुनील तटकरे राज्याचे अध्यक्ष आहेत, ते सर्वांना बरोबर घेऊन काम करतात. सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खूप चांगलं काम ते करत आहेत, त्यामुळे त्यांच्याबद्दल वावड्या उठवणं चुकीच आहे, असे म्हणत दत्तात्रय भरणे यांनी सुनेत्रा पवार आणि प्रशांत किशोर यांच्या भेटीवर स्पष्टीकरण दिलं आहे. यावेळी, त्यांनी हर्षवर्षन सपकाळ यांच्याकडून करण्यात आलेल्या टीकेचाही निषेध व्यक्त केला.



दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी पवार कुटुंबयांना जाणीवपूर्वक त्रास दिला जातोय का, असा सवाल करत उमेश पाटील यांनी पक्षातीलच काही नेत्यांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला होता. त्यासंदर्भात बोलताना भरणे म्हणाले की, पक्षात काहीही चुकीचे चाललेलं नाही. सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील तटकरे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बळकट आहे. पक्षाच्या सर्वच कार्यकर्त्यांना न्याय देण्याची भूमिका हे सर्व नेते मंडळींची असते. सुनेत्रा पवार आमच्या प्रमुख आहेत, सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असे भरणे यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात...

### महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी खासदार मोदींना भेटणार

मुंबई : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याचं कारण सांगितलं. याशिवाय केंद्र सरकार आणत असलेल्या एफसीआरएला दुरुस्ती विधेयकाला विरोध राहणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मतदारसंघ फेररचना विधेयक आलेलं नाही, असं सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलं. एक दोन खासदारांची भूमिका होती की महाराष्ट्राचे गंभीर प्रश्न आहेत. दुर्दैवानं संसद चालत नाही. त्यामुळं माननीय पंतप्रधानांना जी परिस्थिती महाराष्ट्रात आहे ज्यात पाण्याचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्या असतील. सातत्यानं शहरीकरणात होणारे मोठे प्रश्न आहेत. सगळ्या खासदारांना ५ कोटी रुपयांचा विकासनिधी मिळतो, त्याच्या अंमलबजावणीला आव्हानं येतात. महाराष्ट्र सरकारकडून अपेक्षित मदत खासदारांना मिळत नाहीत,असे प्रश्न जे विकासाच्या चौकटीतील आहेत, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं. आपण हे सगळे प्रश्न घेऊन पंतप्रधानांकडे जाऊ या का या भूमिकेतून आठ खासदारांनी मोदींकडे वेळ मागितली होती. आमच्या आठ खासदारांना पंतप्रधान मोदी यांनी सोमवारी सकाळी 11 वाजता संसदेतील कार्यालयात भेटीची वेळ दिली आहे. एकनाथ शिंदे यांच्या खासदारांना नाश्त्याला बोलावलं होतं, आम्हाला नाश्त्याला बोलावलं नाही, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं.

### कंपनीकडून ‘Unhappy Leave’ पॉलिसी

सोलापूर : दैनिक संध्या

कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करून पँग डाँग लाई या चीनी रिटेल कंपनीने एक अनोखे रजा धोरण लागू केले आहे, जे सध्या चर्चेत आहे. अलीकडेच कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी "अनहॅपी लिव्ह" सुरू केली आहे. या नवीन धोरणांतर्गत, जर कर्मचाऱ्यांना मानसिक किंवा भावनिकदृष्ट्या अस्वस्थ वाटत असेल, तर ते दरवर्षी १० दिवसांपर्यंतची रजा घेऊ शकतात. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीचे संस्थापक आणि अध्यक्ष यू डोंगलाई म्हणतात की, कोणताही कर्मचारी नाखूश असताना किंवा दबावाखाली असताना त्याला काम करण्यास भाग पाडले जाऊ नये. त्यांच्या मते, जर एखाद्या कर्मचाऱ्याची प्रकृती ठीक नसेल, तर त्याला विश्रांती घेण्यासाठी आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी वेळ दिला पाहिजे.

### फडणवीसांचे डाव संपले, आता माझी वेळ : जरांगे

सोलापूर : दैनिक संध्या

मराठा समाजाची कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात येत असल्याच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेत पुन्हा एकदा राज्य सरकारवर, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर सडकून टीका केली आहे. "सत्तेचा गैरवापर करून मराठ्यांची कुणबी प्रमाणपत्रे जाणीवपूर्वक रद्द केली जात आहेत. मात्र, फडणवीसांचे आता सर्व डाव संपले असून, आता माझा डाव सुरू होईल," असा उघड इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. सोलापूरच्या शिवाजी चौकात जरांगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर जिल्ह्यातील प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे यांनी काही कागदोपत्री पुरावेही माध्यमांसमोर सादर केले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देताना होणाऱ्या दुजाभावावर जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला.

# एसएनसीयू व बालकांवरील उपचारांसाठी सर्वतोपरी उपाययोजना : प्रकाश आबिटकर

## आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करणार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील नवजात बालकांना वेळेवर, दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, तसेच ‘एसएनसीयू’मधील उपचार अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. एनआयसीयू व बालकांवरील उपचार या विषयावर आरोग्य भवन येथे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक झाली. यावेळी आमदार बापूसाहेब पठारे, आरोग्य सेवा (प्राथमिक) संचालक डॉ .विजय कंदेवाड तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी नवजात बालकांच्या उपचारासाठी उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ, वैद्यकीय उपकरणे तसेच महानगरपालिका रुग्णालयांमधील विद्यमान परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राज्यातील कोणत्याही बालकाला उपचाराअभावी अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी दिल्या. बालकांच्या उपचारासाठी आवश्यक पायाभूत



सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी नगरविकास विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाशी योग्य कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना तातडीने पत्र पाठविण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. राज्यातील बालआरोग्य सेवा अधिक सक्षम, प्रभावी आणि सर्वसमावेशक करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्राधान्याने राबविण्यात येतील, असा विश्वासही मंत्री आबिटकर यांनी यावेळी व्यक्त केला.

# तुम्ही गद्दार म्हणत राहा; शिंदेंचे आमदार-खासदार वाढतायत

■ अधिवेशन काळात आदित्य ठाकरे यांच्या भाजप नेत्यांच्या भेटींचा रामदास कदमांनी दिला दाखला

## रामदास कदमांचा ठाकरेंवर थेट हल्लाबोल

■ मुंबई (दै. संध्या)

उद्धव ठाकरेंना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी एकनाथ शिंदे दिसत असल्याची टीका शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी केली आहे. शिंदे पंतप्रधानांना भेटले म्हणजे मोदी त्यांचे बॉस झाले का? असा सवाल देखील रामदास कदम यांनी केला. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंनीही पंतप्रधानांची भेट घेतली होती. तेव्हा पंतप्रधान तुमचे बॉस झाले का? असा टोला कदमांनी ठाकरेंना लगावला. राज्याचा उपमुख्यमंत्री विकास कामांसाठी पंतप्रधानांना भेटू शकतो, असे कदम म्हणाले. तुम्ही गद्दार म्हणत राहा; तुमचा पक्ष संपतोय, शिंदेंचे आमदार-खासदार वाढतायत असेही कदम म्हणाले.

उद्धव ठाकरेंनी आपण बाळासाहेबांचे सुपुत्र आहोत, याची जाणीव ठेवावी. टीका करत बसा, आम्ही कामातून उत्तर देऊ असेही ते म्हणाले. अधिवेशन काळात देवेंद्र फडणवीसांसह इतर नेत्यांची आपल्या पिल्लाने बुके घेऊन भेट घेतली, याची माहिती घ्या. मग फडणवीस व अन्य नेते तुमच्या पिल्लाचे बॉस झाले का? असा सवालही



कदम यांनी केला. अधिवेशन काळात आदित्य ठाकरे यांच्या भाजप नेत्यांच्या भेटींचा रामदास कदम यांनी दाखला दिला आहे. दुसऱ्याकडे एक बोट दाखवताना चार बोटं आपल्याकडे असतात, हे लक्षात ठेवा असेही कदम म्हणाले. उद्धव ठाकरेंच्या मनात एकनाथ शिंदेंविषयी केवळ द्वेष असल्याचे रामदास कदम म्हणाले. तुम्ही गद्दार म्हणत रहा; तुमचा पक्ष संपतोय, शिंदेंचे आमदार-खासदार वाढतायत असेही ते म्हणाले. टीका करत बसा, आम्ही कामातून उत्तर देऊ असे ते म्हणाले.

चिंता नको, मी तुमच्या पाठिशी आहे हा धमकीवजा संदेश मोदींनी नेमका कोणाला दिलाय? आणि गद्दारांना आता नेमकं भय कसलंय? वॉशिंग मशिनमध्ये धुऊन घेतल्यानंतर सुद्धा घाबरून तुमची पळापळ का होतेय? का शेपट्या घालून तुम्ही मोदींकडे जाताय?" अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्ला चढवला. हा संपूर्ण घटनाक्रम सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. ही लढाई आता केवळ शिवसेनेपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर गद्दारीचा व्हायरस हा लोकशाहीचा जीव घेत आहे. संविधानाबद्दल प्रेम असणाऱ्या तमाम काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या देशभक्तांना मी आवाहन करतोय की, तुम्ही आता ही लढाई आपण सगळ्यांनी मिळून एकत्रित लढण्याची गरज आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले की, पंतप्रधानांना आपल्या देशातले तरुण भेटत नाहीत, अगदी रात्री मध्यरात्री एकदम फ्रेंड्स म्हणून त्यांना इन्स्टाग्राम वरून संदेश देतात. आता इन्स्टाग्राम वरून सरकार चालवण्याची वेळ आली आहे, एवढी यांची आता हालत खराब झाली आहे. जे काँग्रेसला जमलं नाही गेल्या 60-65 वर्षात, ते यांनी करून दाखवलं. कारण एवढ्या शिव्या आणि नालस्ती पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या वाट्याला आलेली आहे.

# श्री गुरु तेग बहादुरजींचे सर्वोच्च बलिदान स्वातंत्र्याचा दीपस्तंभ : राज्यपाल

## नवी मुंबईत ‘श्री गुरु तेग बहादुरजी यांचा वारसा’ विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

■ नवी मुंबई (दै. संध्या)

*अन्य धर्माच्या अनुयायांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे आणि मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी स्वतःच्या प्राणांचे बलिदान देणारे श्री गुरु तेग बहादुरजी यांचे जीवन आणि विचार हे केवळ ऐतिहासिक स्मरण नसून आधुनिक लोकशाही, सामाजिक सौहार्द आणि धार्मिक स्वातंत्र्याचा जिवंत दीपस्तंभ आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.*

श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या ३५० व्या शहादत दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील पंजाब हेरिटेज भवन येथे आयोजित ‘श्री गुरु तेग बहादुरजी यांचा वारसा’ या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय, साहित्य अकादमी नवी दिल्ली आणि पंजाबी कल्चरल अँड वेल्फेअर असोसिएशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले होते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नरनावरे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, उपाध्यक्ष कुमुद शर्मा, हरियाणा साहित्य आणि सांस्कृतिक अकादमीचे अध्यक्ष कुलदीप चंद्र अग्निहोत्री, साहित्य अकादमीचे सचिव वरुण गुलाटी, प्रशासक तख्तश्री अबचल नगर, हुजूर साहिब विजय सतबीर सिंह, राज्यपालांचे संयुक्त सचिव एस. राममूर्ती यांच्यासह साहित्यिक, विद्वान आणि सिख समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा यांनी भाषणाच्या सुरुवातीस महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांमधील शतकानुशतकांच्या समृद्ध आध्यात्मिक व सांस्कृतिक नात्याचा गौरव केला. महाराष्ट्र ही संतांची पावन भूमी असून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत एकनाथ यांच्या भूमीतून संत नामदेव महाराज भक्तीचा संदेश घेऊन पंजाबमध्ये गेले होते, ज्यांच्या पवित्र रचना आजही ‘श्री गुरु ग्रंथ साहिब’ मध्ये आदरपूर्वक विराजमान आहेत. तसेच कालांतराने श्री गुरु गोविंदसिंहजी महाराष्ट्रातील नांदेड येथे आले आणि तेथे स्थापित ‘तख्त श्री हजूर साहिब’ हे दोन्ही राज्यांमधील या अनोख्या सांस्कृतिक बंधाची साक्ष देत आहे, असे सांगताना राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्र आणि पंजाब ही समान मूल्ये, आदर्श आणि धैर्याची जपणूक करणारी ‘जुळी राज्ये’ आहेत. गुरुजींचे विचार केवळ चर्चासत्रांपुरते मर्यादित न ठेवता ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्थात्मक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे सांगत राज्यपालांनी एक महत्त्वाची शिफारस केली. महाराष्ट्रात असलेल्या



> श्री गुरु तेग बहादुरजी यांनी १६७५ मध्ये दिलेले सर्वोच्च बलिदान हे भारताच्या नागरी आणि सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत अद्वितीय आणि प्रेरणादायी अध्याय असल्याचे सांगत राज्यपालांनी अधोरेखित केले की, गुरुंनी केवळ स्वतःच्या अनुयायांसाठीच नव्हे, तर प्रत्येक मानवाला भीतीशिवाय आपापल्या धर्माचे आचरण करण्याचा अधिकार आहे या सार्वभौम मूल्यासाठी ‘हिंद दी चादर’ बनून प्राणाहुती दिली. भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये शतकांआधीच गुरुजींनी आपल्या जीवनकार्यातून प्रत्यक्ष जगून दाखवली होती. आजच्या सामाजिक आणि मानसिक ताणतणावाच्या काळात गुरुजींची शिकवण आपल्याला आंतरिक शक्ती, नम्रता, करुणा आणि निष्काम सेवेची दिशा दाखवते.

६५ सार्वजनिक व खाजगी विद्यापीठांपैकी एका विद्यापीठात‘श्री गुरु तेग बहादूर अध्यासन’(Chair) स्थापित करण्यात यावे, असे आवाहन त्यांनी केले. हे अध्यासन आंतरधर्मीय संवाद, संशोधन, अध्यापन आणि गुरुजींच्या विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याच्या संदेशाचा प्रचार-प्रसार करणारे कायमस्वरूपी केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साहित्य अकादमी आणि पंजाबी कल्चरल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशनने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे राज्यपालांनी मनःपूर्वक कौतुक केले. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी या प्रसंगी दिलेल्या ध्वनी संदेशात म्हटले आहे की, श्री गुरु तेग बहादुरजी यांचे बलिदान हे कोणालाही भयभीत न करता कोणाच्याही भयापुढे न झुकणाऱ्या खऱ्या ज्ञानाचे आणि मानवी स्वातंत्र्याचे अमर प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार या ऐतिहासिक ३५० व्या शहादत दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे, जेणेकरून येणाऱ्या पिढ्यांना गुरुजींच्या महान त्यागातून आणि अमूल्य संदेशातून निरंतर प्रेरणा मिळावी. गुरुजींचे विचार हे क्षेत्र, भाषा आणि समुदायाच्या सीमा ओलांडून एकता, साहस, करुणा आणि सेवेवर आधारित ‘विकसित भारत’ घडवण्याचा राष्ट्रीय संकल्प पुन्हा दृढ करणारे आहेत. हरियाणा साहित्य आणि संस्कृती अकादमीचे अध्यक्ष डॉ. कुलदीप चंद अग्निहोत्री यांनी आपल्या भाषणात ‘धर्मो रक्षति रक्षितः’ या सनातनी मूल्याचा उल्लेख करत, जेव्हा जेव्हा धर्मावर संकट आले तेव्हा श्री गुरु तेग बहादुरजींसारख्या महापुरुषांनी दिलेल्या बलिदानामुळेच भारतीय संस्कृती हजारो वर्षांपासून अखंड टिकून असल्याचे सांगितले. गुरू नानक देवजींपासून सुरु झालेल्या ध्येयनिष्ठ परंपरेचा मागोवा घेतला. साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या बलिदानाचे आणि संरक्षणाचे स्मरण करत, त्यांची परंपरा मानवाला समाधीकडून शहादतीकडे आणि शहादतीकडून समाधीकडे नेणारा मार्ग दाखवते असे सांगितले. गुरुजींच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्त देशभरातील पाच प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रांच्या मालिकेतील हे तिसरे पुष्प महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत गुंफण्यात आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

## संपादकीय

# वर्तमानात राहतो आम्ही...

अभिजित दीपके व सहकाऱ्यांच्या भूमिका पाहिल्या तर त्यांची टीकेला उत्तर देतानाची भाषा आक्रमक वाटली तरी त्यातून 'मेसेज' जातो ते असा की, ही 'जेन झी' वर्तमानात प्रश्न विचारते, वर्तमानात भूमिका घेते आणि वर्तमानातच राजकीय चर्चेचा विषय ठरते. कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) नावाच्या युवकांच्या नव्याकोऱ्या संघटनेनं 'नीट' पेपरफुटीनंतर अभिजीत दीपके या तिशीतल्या तरुणाच्या नेतृत्वाखाली दिल्लीत सुरू केलेल्या विद्यार्थी आंदोलनास अभूतपूर्व यश मिळालं. त्यानंतर देशातले राजकीय पक्ष, सांस्कृतिक संघटना वगैरेतल्या उच्चपदस्थांना 'जनरेशन झेड' म्हणजे 'जेन झी'ची आवर्जून दखल घेण्याचा जो 'जंतर-मंतर' साक्षात्कार झालाय त्याचे नवनवीन आविष्कार रोज दिसू लागलेत. आज सोशल मीडियापासून संसद-विधिमंडळांच्या सभागृहांपर्यंत सर्वत्र 'जेन झी आवडे सर्वांना...' असं चित्र दिसत आहे. सीजेपीनं साम-दाम-दंड-भेद या साऱ्यांना पुरून उरत, देशाच्या शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा देणं (किंवा तसा तो घेण्यास भाग पाडणं) हे उद्दिष्ट साध्य केलं, तेही राजकीय आक्रस्ताळेपणा न करता. 'जागतिक लोकसंख्या अंदाज २०२४' व अन्य अहवालांनुसार, २०२६ पर्यंत एकट्या भारतात १४ ते २९ वर्षे वयोगटातील अंदाजे ३४५ ते ४०७ दशलक्ष तरुण असतील. ही संख्या जगातील सर्वांत मोठी 'जेन झी' लोकसंख्या आहे. आता एखाद्या पुढाऱ्याची सभा संपली की त्यावरचे रील्स, पॉडकास्ट, फॅक्ट-चेक, मीम्स आणि विश्लेषणे यांचा धडाकाच सुरू होतो. त्यामुळंच राजकीय पक्षांच्या नेतृत्वानंही हे ओळखलं असावं की जेन झीकडे फक्त मतपेढी म्हणून पाहून चालणार नाही. ही जेन झी मतनिर्माताही असल्याचं दिल्लीतून दिसल्यानं कदाचित प्रत्येक पक्षनेता तिच्याशी मैत्री करण्यास उत्सुक दिसतो आहे. जंतर-मंतरच्या आंदोलनातही शंभर टक्के विद्यार्थी मोबाइलचा सक्रिय वापर करत होते. आंदोलनाबाबत जगात उमटणाऱ्या प्रतिक्रियांची माहिती सौरव दास, दीपके आदींपर्यंत तत्काळ पोहोचून त्याची दखल, त्यावरचं मत हेही त्याच वेगानं दिलं जाईल याचीही काळजी घेतली जात होती. सत्तारूढांच्या 'मीडिया सेल'ला इथंच चकवा मिळाला असावा... सीजेपीच्या आंदोलनानंतर अचानक सर्वच राजकीय पक्ष सोशल मीडियावर अधिक सक्रिय झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्काळ युवकांशी डिजिटल माध्यमातून संवाद वाढवण्याचा पहिला प्रयत्न सुरू केला. तरुणाईशी संवाद साधण्यासाठी मोदी यांनी अलीकडे इन्स्टाग्रामवर एकामागोमाग एक पोस्ट केल्या. त्याची वेळही त्यांनी मध्यरात्रीची निवडली. त्यामागं जेन झी त्याच प्रहरी जागती असते हा फीडबॅक होता! भाजपच्या एका नेत्याच्या म्हणण्यानुसार त्यांच्या पक्षात तंत्रस्नेही नवाचाराशी इतक्या चटकन जुळवून घेणारे एकच नेते आहेत ते म्हणजे नरेंद्र मोदी! पाठोपाठ काँग्रेसचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांनीही 'आस्क मी एनीथिंग' हा उपक्रम सुरू करून त्यांना बेधडक प्रश्न विचारण्याचं इन्स्टाग्राम निमंत्रण जेन झीला दिलं. भाजपच्या खासदारांना – नेत्यांना समाज माध्यमांवर सक्रिय होऊन त्याचे पुरावे नोंदवण्याचं फर्मान निघालं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनही नव्या पिढीशी संवाद वाढवण्याबाबत सर्वोच्च भाष्य झालं. ही लाट एकाच वेळी कशी आली असावी? किती नेते व्हॉटसअप, फेसबुक, एक्स यांवरील 'लॉगइन आयडी'साठी आत्मनिर्भर आहेत हाही संशोधनाचा विषय! सध्याच्या संसदेतील जवळपास ४५ ते ५० खासदार साठीच्या आतले किंवा आसपासचे आहेत. अनेक मंत्री आणि बहुतांश तरुण खासदार डिजिटल माध्यमांवर विलक्षण सक्रिय राहून तंत्रज्ञानाचा वापर करतात. पण अपवाद वगळता अनेक ज्येष्ठांकडचा मोबाइल बहुतेक वेळा पीए, ओएसडी वगैरेंच्या हातीच विसावलेला दिसतो. दीपके व सहकाऱ्यांनी देशाच्या शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मिळवल्यानंतरही विजयाच्या जल्लोषात नवं आंदोलन जाहीर करण्याऐवजी सीजेपीच्या राजकीय बांधणीचा विचार सुरू केला त्यामागंही समाज माध्यमांवर त्यांना मिळालेल्या सूचनांचा मोठा वाटा होता व आहे. सोनम वांगचुक यांना अटक व विद्यार्थ्यांवरचा लाठीमार या घटनांनी आंदोलनाला नवं वळण दिलं. दिल्ली पोलिसांचा अतीउत्साहीपणा लाठ्याकाठ्या चालवण्यापेक्षा जंतर-मंतरवरच्या गर्दीत लपलेले समाजकंटक शोधण्यासाठी कामी आला असता तर?

## संस्कृत सुभाषित

कालभोजनमारोग्यकराणां श्रेष्ठम् ॥

अर्थ : व्यवसायानुसार भोजनाची वेळ वेगळी असली तरी त्यावेळी नित्यनियमितपणे भोजन घेणे हे श्रेष्ठ असते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | | | | 8 | | |
| | 1 | | 5 | 2 | | | | 4 |
| 7 | | 9 | 6 | 8 | | | | |
| | 5 | | | 6 | 7 | 2 | 8 | |
| 6 | | 2 | | 3 | | 1 | | 9 |
| | 3 | 8 | 2 | 1 | | | 6 | |
| | | | | 7 | 8 | 9 | | 2 |
| 2 | | | | 5 | 6 | | 4 | |
| | | 4 | | | | | | 5 |

### : सूडोकु :


**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०३४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 1 | 8 | 5 | 9 | 2 | 4 | 6 |
| 8 | 4 | 9 | 6 | 2 | 1 | 5 | 7 | 3 |
| 2 | 5 | 6 | 7 | 4 | 3 | 8 | 9 | 1 |
| 9 | 1 | 8 | 3 | 7 | 2 | 4 | 6 | 5 |
| 7 | 2 | 4 | 9 | 6 | 5 | 1 | 3 | 8 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 8 | 9 | 2 | 7 |
| 4 | 3 | 2 | 1 | 8 | 6 | 7 | 5 | 9 |
| 6 | 8 | 5 | 2 | 9 | 7 | 3 | 1 | 4 |
| 1 | 9 | 7 | 5 | 3 | 4 | 6 | 8 | 2 |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३५



**आडवे शब्द**

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन
४. गुणज्ञ
८. वक्र
११. पानाचे दुकान
१२. अफूचे बी
१४. महिना
१५. पहारेकरी
१८. विपुलता
२०. हस्तेपरहस्ते
२२. जिवलग मैत्रिण
२३. निकट
२५. रडगाणे, रडकथा
२६. अरण्य
२८. वृक्ष
३०. होडी चालवणारा
३२. किल्ली
३४. घनिष्ठ संबंध
३६. समुद्राच्या लाटांचा आवाज
३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक
३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या मेरा साथ भी गंवारा नहीं'
४०. मीठ
४१. थोडेसे
४२. जन्मदाता
४३. हेतू, कारण, स्वार्थ
४५. रेती
४६. विष्णुपत्नीचे एक नाव
४८. वर्ष, साल
४९. लिंबूसाखरेचे थंड पेय
५२. अंगावर येणारा काटा
५४. पादत्राण
५५. गहन
५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी
५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६०. घास पण गवत नव्हे
६१. एक चतुर्थांश
६२. व्रत, नेम
६४. उदर
६५. जयघोष
६७. अनुमती
६९. सुंभाबरोबर न जळणारा
७१. मोठा जाड अंगरखा
७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा
७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे)
७७. गवंडी
७८. अचेतन शरीर
७९. पार्वतीचे उग्र रूप
८०. वशिला
८१. सोशिकपणा

**उभे शब्द**

१. आस्था, फिकीर
२. तारणारा
३. आयुध
४. मद्य तयार करणारा-विकणारा
५. रुक्ष
६. सेवक
७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालणारी
९. जास्तीतजास्त
१०. मच्छर
११. जपून ठेवलेली गोष्ट
१३. अखंड
१६. मोठे भांडण
१७. राममंदिरातील मारुतीचे रूप
१९. जीव, प्राण, चैतन्य
२०. चलनवलन
२१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ
२४. उगीच
२७. आवर घालणारी वादी
२९. शंभर पैशाचे नाणे
३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे
३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा
३५. खुमारी
३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग
४१. आकाश
४२. पाण्याचा साठा असलेली जागा
४३. अंत:करण
४४. हावरटपणा
४७. इंद्रिय
४८. हुक्की, लहर
५०. मजबूत, भक्कम
५१. चरण
५३. राजसुख
५५. डोक्याला झालेली खोल जखम
५६. मनातली आग
५७. स्थानापन्न (होणे)
५९. उत्सवाचे दिवस
६१. चबुतरा
६३. भेग, चीर
६६. अंजन
६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह
७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच
७१. नाजूक
७३. पत्र
७४. एक गळित धान्य
७५. वारा
७६. यज्ञ
७७. पौर्णिमा

**जम्बो शब्दकोडे क्र. १०३४ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.पणजोबा ४.धुसफूस ७.हजरजबाबी १२.गळका १४.जनावर १५.कडवा १७.वेतनपत्रक २०.तसा २२.ढाब २३.गट्टी २४.पाचर २६.रतन २८.जकात २९.जरड ३१.साजरा ३८.वादविवाद ४०.करीब ४२.चाट ४३.बंदर ४५.डाल ४६.करडा ४७.तसा ४८.दीर ५०.दाभण ५१.दास ५२.सतार ५४.वाटप कर ५५.खबरदार ५७.रास ५८.सजा ५९.नारद ६०.बाबा ६२.अदबशीर ६४.दीन ६५.पटाशी ६६.दम ६९.रजा ७०.धर्म भीम अर्जुन नकुल सहदेव ७६.मामा ७७.वाट ७८.राग ८०.ताशी ८१.कमान ८२.कारभारी ८३.तळ

उभे उत्तर : १.पदक २.जोगवा ३.बाळ ५.सज्जनगड ६.सर्वत्र ७.हज ८.जनाधार ९.रव १०.जरतर ११.बीन १३.कावेबाज १६.डरकाळी १८.पट्टी १९.कपाळ २१.सात बाराचा उतारा २५.चकाचक २७.नग २८.जमावबंदी ३०.रखवालदार ३१.पुणेकर ३२.कसाबसा ३५.साद ३८.वार ३९.विडा ४१.रीतसर ४४.दरवाजा ४६.कणखर ४९.आसमान ५१.दादादादी ५३.रसरशीत ५६.बदक ५८.सरोद ५९.नार ६१.बापजादे ६३.बदाम ६७.मधमाशी ६८.धनवान ६९.रहदारी ७१.भीषण ७२.अथक ७३.नट ७४.लकेर ७५.वरात ७६.माता ७९.गळ

## गुरु वचन

### सौंदर्य व प्रेम

सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड–चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फुलणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाहतात– लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म–जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०४८ – २३ दिवस पोपपदी राहिल्यावर पोप दमासस दुसऱ्याचा मृत्यू.
- १८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – सीडर माउंटनची लढाई.
- १९०२ – एडवर्ड सातवा इंग्लंडच्या राजेपदी.

### राष्ट्रीय

- १९४२ – चले जाव आंदोलन – मुंबईत महात्मा गांधी व इतर काँग्रेस नेत्यांना अटक. हा दिवस ऑगस्ट क्रांतीदिन म्हणून प्रसिद्ध आहे.
- १९७१ – भारत आणि रशियात २० वर्षांसाठी शांतता आणि सहकाराचा करार करण्यात आला.
- १९७५ – पंतप्रधानांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागण्यास मनाई करणारे किंवा त्यांच्याविरुद्ध खटला भरण्यास मनाई करणारे ४१ वे घटनादुरुस्ती कलम संसदेत मंजूर. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.

### जन्म

- १९०२ – एडवर्ड क्लार्क, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९११ – खुरशेद मेहेरहोम जी, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९१९ – जूप डेन उइल, नेदरलँडचा पंतप्रधान.
- १९२६ – डेव्हिड ऍटकिन्सन, वेस्ट इंडीझचा क्रिकेट खेळाडू.
- १९३९ – रोमानो प्रोडी, इटलीचा पंतप्रधान.
- १९५७ – मेलानी ग्रिफिथ, अमेरिकन अभिनेत्री.

### निधन

- ११७–ट्राजान, रोमन सम्राट.
- ३७८–व्हॅलेन्स, रोमन सम्राट.
- ११०७ – होरिकावा, जपानी सम्राट.
- १२५० – एरिक चौथा, डेन्मार्कचा राजा.
- २००६ – असगरी बाई, पद्मश्रीप्राप्त ध्रुपद गायिका.

प्रतिवार्षिक पालन

राष्ट्र दिन – सिंगापुर.

राष्ट्रीय महिला दिन – दक्षिण आफ्रिका

## उपदेशकथा

### जिभेचं बंधन व्यवहारबुद्धी

एका राजाच्या पदरी एक हुशार माळी होता. त्याचं उद्यान मोठं सुंदर असे. राजानं उद्यानात येण्याची इच्छा व्यक्त केली आणि काहीतरी वेगळं, नवलाचं पहायला मिळेल का असं माळ्याला विचारलं. माळ्यानं होकार दिला पण थोडी मधाची मागणी केली.

दोन–चार दिवसानं राजाची उद्यान भेट ठरली. या दोन दिवसात माळ्यानं गवताला मध फासून मधोमध टाकलं होतं आणि थोड्या अंतरावरही विखरून टाकलं होतं.

एरव्ही माणसाच्या वाऱ्यालाही न उभा राहणारा वातमृग त्या गवताच्या मधाच्या गोडीनं राजवाड्यातून उद्यानात आला होता. आणि शांतपणे गवत खात होता. माळ्यानं हे आश्चर्य राजाला दाखवलं. राजा म्हणाला, माणसासमोर कधीही न येणारा मृग केवळ रसतृष्णेनं आला. जिभेचं बंधन मोठं खरे!

कथा उपदेश : जिभेचं बंधन मोठं बळकट.

## : SMS :

Friend 1: Bhai Barbeque Nation ₹419 me unlimited kha ke aaya
Friend 2: Kya khaya?
Friend 1: Pehle 2 plate salad, phir bill dekh ke bhookh hi mar gayi

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.२ | २३.२ |
| अहमदनगर | ३१.४ | २२.५ |
| अकोला | ३२.५ | २५.६ |
| अमरावती | ३१.८ | २४.७ |
| बीड | ३४.४ | २७.१ |
| भंडारा | ३४.६ | २६.७ |
| बुलढाणा | ३३.६ | २६.९ |
| चंद्रपूर | ३५.७ | २७.१ |
| चेन्नई | ३९.२ | ३०.४ |
| नवी दिल्ली | ३३ | २७.४ |
| धुळे | ३५.५ | २५.१ |
| गोंदिया | ३२.६ | २६ |
| जळगाव | ३२.४ | २५.६ |
| कोल्हापूर | २८.८ | २३ |
| लातूर | ३२.७ | २३.४ |
| मुंबई | ३४.६ | ३०.३ |
| नागपूर | ३३.८ | २६.९ |
| नांदेड | ३२.६ | २५.२ |
| नंदूरबार | ३२.१ | २४.३ |
| नाशिक | २९.३ | २३.५ |
| पुणे | २६.९ | २२.२ |
| पंढरपूर | ३४.९ | २३.९ |
| सातारा | ३०.६ | २२.७ |
| सांगली | ३१.५ | २३.३ |
| सोलापूर | ३४.९ | २४.२ |
| वर्धा | ३४.७ | २६.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम आप्तजन, मित्रांशी वाद होतील. स्वत:च्या विचाराने काम करा.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. विरोधकांपासून सावधान रहा.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पश्चिम विनम्रतेने आणि सांमजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर सत्कार्याची आवड निर्माण होईल. फायद्याचे अनेक मार्ग सापडतील. कौटुंबिक सुख मिळेल.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व प्रतिष्ठित लोकांशी भेटी होतील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल. वादांपासून स्वत:ला दूर ठेवा.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : उत्तर अचानक लाभ होऊन आपल्याला प्रसिद्धी मिळू शकते. व्यापारामुळे प्रवास होऊ शकतो. घरा संबंधी समस्या दूर होईल.

**मकर :** शुभ रंग : पांढरा,शुभ दिशा:उत्तर शुभ, मंगल आणि धार्मिक कार्यात पैसे खर्च होतील. नोकरी, राज्यपक्षात अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण चांगली बातमी उत्साह वाढविणार आहे. काम करण्याच्या स्थितीत सुधारणा होईल.

**कुंभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण उद्योग–धंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : दक्षिण एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर सदभाव ठेवा योग्य फळ मिळेल. व्यापारामध्ये विस्तार होण्याचे योग आहेत.

## पंचांग

९ ऑगस्ट २०२६
रविवार
विक्रम संवत्– २०८२
आषाढ शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– आषाढ
ऋतु– सौर वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि:एकादशी
११:०५:१७
नक्षत्र:मृगशिर्षा
१४:४३:१०
योग:हर्षण २६:०३:५२+
करण:बालव ११:०५:१७
करण:कौलव २१:३३:५९

सूर्य:कर्क
चन्द्र:मिथुन०३:४८:३९
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – सफर
तारीख – २५
विशेष
कामिका एकादशई
अगस्ती दर्शन



जागतिक आदिवासी दिन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे : डॉ. मोहन भागवत

## खामगावातील पारधी-आदिवासी आश्रमशाळेतील तीन भव्य क्रीडा संकुलांची पुण्यातील अमनोरा येस फाऊंडेशनकडून उभारणी

■ खामगाव/पुणे (दै. संध्या)

आज देशभरात आपण ज्यांना भटके-विमुक्त म्हणतो, तो समाज एकेकाळी ज्ञानी समाज होता. हा समाज आपले ज्ञान निरपेक्षपणे समाजाला वाटण्यासाठी घराबाहेर पडला आणि काळाच्या ओघात हा समाज भटका आणि वंचित बनत गेला. ब्रिटिशांच्या काळात स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला म्हणून संपूर्ण पारधी-आदिवासी समाजावर गुन्हेगार जमातीचा शिक्का लावण्यात आला, त्यामुळे हा समाज मोठ्या प्रमाणात मागास राहिला. परंतु श्री सद्गुरू धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्टच्या या शाळेत अमनोरा येस फाउंडेशनच्या पुढाकाराने पारधी मुलांसाठी अत्याधुनिक सुविधा तयार झाल्याचे पाहून अत्यधिक आनंदाची आत्मानुभूती होत आहे. देशाला ख-या अर्थाने विश्वगुरू बनवायचे असेल, तर अशा वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डा. सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.




खामगाव येथे स्व. भय्यूजी महाराज यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या पारधी-आदिवासींच्या आश्रम शाळेत अमनोरा येस फाउंडेशन द्वारे तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक तीन क्रीडा संकुलांचे व विविध प्रकारच्या सुविधांचे उद्‌घाटन डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते शुक्रवार ८ ऑगस्ट रोजी करण्यात आले. या वेळी मोहन भागवत बोलत होते. या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, सिटी कार्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर अनिरुद्ध देशपांडे, श्री सद्गुरू धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट इंदौरच्या विश्वस्त डा. आयुषी देशमुख आदि उपस्थित होते. सर्वप्रथम मोहन भागवत यांनी अमनोरा येस फाउंडेशनच्या सहकार्याने आश्रम शाळेत करण्यात आलेले विविध विकासकार्याची पाहणी केली. शाळेतील अत्याधुनिक खेळाची मैदाने, मुलांसाठी स्वयंपाक तयार करणारी भोजनशाळा, विद्यार्थ्यांनी तयार केलेली परसबाग आणि वसतिगृहाची डॉ. भागवत यांनी पाहणी केली. आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. मोहन भागवत यांचे सहर्ष स्वागत केले.

आदिवासी मंत्री डा. अशोक उईके यांनी पारधी व आदिवासींच्या विकासासाठी शासन सातत्याने प्रयत्न असून, त्यानुसार विविध योजना राबवल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. आकाश फुंडकर म्हणाले की, ही आश्रमशाळा खामगावची शान असून, या ठिकाणी वंचित मुलांच्या विकासासाठी होणारे कार्य नक्कीच प्रशंसेस पात्र आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक कुलकर्णी यांनी केले, तर आश्रमशाळचे मुख्याध्यापक राठोड यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमात डा. मोहन भागवत यांच्या हस्ते १६ पारधी आदिवासी मुलींना प्रत्येकी १० हजार रुपयांच्या चेकचे वितरण करण्यात आले, तसेच विविध क्षेत्रात कार्य करणा-या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचाही डा. भागवत यांनी सन्मानित केले.

या कार्यक्रमाला विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे, चिखलीच्या आमदार श्वेता महाले, जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

> मोहन भागवत पुढे म्हणाले की, एकेकाळी भारताचा समाज हा पूर्णपणे संघटित होता, परंतु परकीय आक्रमणामुळे समाज गुलाम बनत गेला व नंतर विघटित झाला. त्यातूनच मग समाजात वंचित घटकांची संख्या वाढत गेली. असे असले तरी समाजातील वंचित घटकांनी कधीही पारतंत्र्य स्वीकारले नाही. ते स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीत राहिले. इंग्रजांच्या काळात पारधी-आदिवासींना गुन्हेगार ठरवले गेले, त्यामुळे त्यांचा विकास खुंटला. पारध्यांच्या विकासासाठी संघ अनेक वर्षे प्रयत्नशील आहे. या स्थितीत भय्यूजी महाराजांनी जी शाळा उभारली, त्या शाळेला नवे रूप देण्याचे तसेच येथील मुलांना स्वयंपूर्ण बनवण्याचे कार्य अमनोरा येस फाउंडेशन करीत आहे. हे कार्य नक्कीच प्रशंसेस पात्र आहे. प्रस्तावना करताना सिटी कार्पोरेशनचे एमडी अनिरुद्ध देशपांडे यांनी सांगितले की, डा. मोहन भागवत यांच्या सूचनेनुसारच अमनोरा येस फाउंडेशन या शाळेच्या उत्थानासाठी कार्याला लागली आणि पाहता-पाहता पारधी आदिवासींच्या समाजातील मुले-मुली आज प्रगती आणि स्वयंपूर्णतेच्या आकाशात उंच भरारी घेत आहेत. हा आमच्यासाठी अत्यंत कृतज्ञतेचा क्षण आहे. वंचितांच्या विकासासाठी अमनोरा येस फाउंडेशन शैक्षणिक, वैद्यकीय यासह अनेक प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवून समाजपरिवर्तनाच्या दिशेने कार्य करीत आहे आणि आगामी काळातही हे कार्य अव्याहतपणे सुरू राहील, अशी ग्वाही अनिरुद्ध देशपांडे यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे




### बंधुता व मानवतेच्या भावनेतून 'भारत जोडो' साकारेल : ॲड. प्रार्थना सदावर्ते

पुणे : दैनिक संध्या

"स्वातंत्र्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने ९ ऑगस्ट १९४२ रोजी आयोजिलेल्या अधिवेशनात 'भारत छोडो'चा नारा दिला होता. त्यानंतर पाच वर्षांनी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याच्या ८० वर्षानंतर मात्र आपल्याला 'भारत जोडो' म्हणण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. 'भारत जोडो'चा हा उद्देश साकारण्यासाठी बंधुतेची आणि मानवतेची भावना समाजात रुजवण्याची गरज आहे," असे मत ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी व्यक्त केले. विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता काव्यमंच आणि काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विश्वबंधुतेचा 'तिरंगा महोत्सव' कार्यक्रमात ॲड. सदावर्ते बोलत होत्या. नवी पेठेतील पत्रकार भवनात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बंधुताचार्य प्रकाश रोकडे, साहित्यिक प्रा. शंकर आथरे, कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, स्वागताध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे, बंधुता प्रकाशनच्या संचालक मंदाकिनी रोकडे व आशा शिंदे-गायकवाड उपस्थित होत्या. यावेळी आशा शिंदे-गायकवाड यांना 'संविधान सन्मान साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच प्रा. शंकर आथरे यांच्या 'वाणी विश्वबंधुतेची' या भाषणसंग्रहाचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. ॲड. प्रार्थना सदावर्ते म्हणाल्या, "सध्या आपल्या आजुबाजूला अतिशय वाईट परिस्थिती आहे. शेतकरी आत्महत्या, आंदोलने, खून, हिंसाचार, पेपरफुटी, मंदिरांमधील चोरी, कोलमडलेली कुटुंबव्यवस्था अशा गोष्टी सातत्याने घडत आहेत. यामध्ये सामान्य नागरिक भरडला जात असून, त्याचे प्रश्न कायम आहेत. सामान्यांना सरकारचा आधार वाटेनासा झाला आहे. मात्र मतदारांचा पुढाऱ्यांवर वचक असायला हवा. यासाठी संविधानाला राष्ट्रग्रंथ मानून राष्ट्रबंधुता आणि माणूसकी जपायला हवी." प्रकाश रोकडे म्हणाले, "तिरंगा आणि अशोकचक्र हे आपल्या प्रजासत्ताक भारताच्या एकतेचे, अखंडतेचे आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे. प्रजापिता सम्राट अशोकाने बनवलेले हे चक्र आपल्याला राष्ट्रीय अस्मितेचा, गतिमानतेचा, नितीमानतेचा, परिवर्तनाचा आणि पुरोगामीत्त्वाचा संदेश देते. तेव्हा तिरंग्याचा आपण आदर आणि अभिमान बाळगायला हवा. प्रत्येकाच्या घरामध्ये संविधान आणि तिरंगा असायलाच हवा." यावेळी झालेल्या 'विश्वबंधुतेची पहाट' काव्यसंमेलनात सीमा गांधी, डॉ. वैशाली मोहिते, जयश्री श्रोत्रिय, वर्षा मोरे, निशा खापरे, बबन धुमाळ, पौर्णिमा कुंभारकर, अमित घुले, अश्विनी वाघमारे, नानासाहेब कांबळे, जितेन सोनावणे, विजय रायकर, अजय रायकर, अलका जोशी, पुष्पांजली मराठे, अरुण वाळूंज यांनी कवितांचे सादरीकरण केले.

## वीर धरणातून नीरा नदीपात्रात १५ हजार १११ क्युसेक पाण्याचा विसर्ग



■ पुणे (दै. संध्या)

वीर धरणाची पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी आज, शनिवार (८ ऑगस्ट) सायंकाळी ५.३० वाजता धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. सांडव्याद्वारे १३ हजार ९११ क्युसेक, तर अतिवाहकाद्वारे १ हजार १०० क्युसेक, असा एकूण १५ हजार ११ क्युसेक पाण्याचा विसर्ग नीरा नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसाचे प्रमाण तसेच धरणात होणारी पाण्याची आवक यानुसार विसर्गाच्या प्रमाणात पुन्हा वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नीरा नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे आणि नदीपात्रात अथवा नदीकाठच्या धोकादायक भागात जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता नदीकाठच्या गावांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे. ही माहिती कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्या वतीने देण्यात आली आहे.

## प्रवाहाच्या पलीकडील संधी साधण्यासाठी 'बंधन कॉन्ट्रा फंड'ची सुरुवात

■ पुणे (दै. संध्या)

बंधन म्युच्युअल फंडाने 'बंधन कॉन्ट्रा फंड' या नव्या खुल्या स्वरूपाच्या समभाग गुंतवणूक योजनेची घोषणा केली आहे. बाजारातील प्रचलित प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन मूलभूतदृष्ट्या सक्षम, मात्र तात्पुरत्या कारणांमुळे दुर्लक्षित झालेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीच्या संधी शोधणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

या नव्या निधी प्रस्तावाची सुरुवात १० ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून, २४ ऑगस्ट २०२६ रोजी तो बंद होईल. अधिकृत म्युच्युअल फंड वितरक, ऑनलाइन गुंतवणूक माध्यमे तसेच बंधन म्युच्युअल फंडाच्या संकेतस्थळाद्वारे या योजनेत थेट गुंतवणूक करता येणार आहे.

बंधन कॉन्ट्रा फंड अशा कंपन्यांची निवड करण्याचा प्रयत्न करेल, ज्या क्षेत्राशी संबंधित चिंता, चक्राकार आव्हाने, व्यापक आर्थिक अनिश्चितता किंवा बाजारातील नकारात्मक वातावरणामुळे सध्या दुर्लक्षित ठरत आहेत. मात्र, त्यांच्या व्यवसायाची मूलभूत स्थिती आणि कमाईची क्षमता सुधारल्यास भविष्यात त्यांच्या बाजारमूल्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

या योजनेच्या शुभारंभाविषयी बोलताना बंधन एएमसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल कपूर म्हणाले की, विविध क्षेत्रांमधील मूल्यांकनातील तफावत वाढल्याने निवडक कॉन्ट्रारियन गुंतवणुकीसाठी संधी निर्माण झाल्या आहेत. अनेक कंपन्यांकडे उत्तम व्यवसाय प्रारूप, सुधारत असलेली कमाईची स्पष्टता आणि मजबूत ताळेबंद असूनही, त्यांच्या समभागांचे मूल्यांकन त्यांच्या दीर्घकालीन क्षमतेपेक्षा कमी पातळीवर आहे. अशा परिस्थितीत प्रचलित बाजारमतापलीकडे जाऊन संधी शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी ही परिस्थिती उपयुक्त ठरू शकते.

बंधन कॉन्ट्रा फंड ही सुधारत असलेली मूलभूत स्थिती, कमाईतील वाढ आणि त्यानंतर होणारे बाजारातील पुनर्मूल्यांकन यांचा लाभ घेण्याच्या उद्देशाने शिस्तबद्ध कॉन्ट्रारियन गुंतवणूक चौकट स्वीकारणार आहे. पारंपरिक वाढीवर आधारित आणि मूल्याधारित गुंतवणूक योजनांना पूरक ठरू शकणाऱ्या वेगळ्या समभाग गुंतवणूक धोरणाच्या शोधात असलेल्या गुंतवणूकदारांसाठी ही योजना उपयुक्त ठरू शकते. दीर्घकालीन गुंतवणुकीचा दृष्टिकोन असलेल्या आणि बाजारातील चढ-उतार सहन करण्याची क्षमता असलेल्या गुंतवणूकदारांसाठी या योजनेचा विचार करता येऊ शकतो. तथापि, म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमीच्या अधीन असल्याने गुंतवणूक करण्यापूर्वी योजनेशी संबंधित कागदपत्रे आणि जोखीम घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## सातारा, सोलापूर व पुणे जिल्ह्यातील ९५ हजारावर शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

### शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करुन घेण्याचे प्रशासनाचे आवाहन : कर्जमुक्तीच्या पहिल्या यादीत ६१५ कोटी रुपयांहून अधिक रक्कम कर्ज खात्यात जमा

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पुणे महसूल विभागातील पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील ९५ हजार ६०३ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहेत, अशी माहिती सहकार विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास शुक्रवारी (७ ऑगस्ट) सुरुवात करण्यात आली; यामध्ये कर्जमुक्तीच्या पहिल्या यादीत पुणे जिल्ह्यातील ३८ हजार ९७० पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ३४५ कोटी २५ लाख ५ हजार ५९४ रुपये जमा करण्यात आले आहेत. यात सातारा जिल्ह्यातील १९ हजार ५८ शेतकऱ्यांना १४२ कोटी ७ लाख ३९ हजार २८४ रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ३९४ शेतकऱ्यांना १२८ कोटी १० लाख ४४ हजार १६१ रुपये याप्रमाणे ६९ हजार ४२२ शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण ६१५ कोटी रुपयाहून अधिक रक्कम कर्ज खात्यावर जमा करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील १ हजार ३५१, भोर २ हजार ३०८, मुळशी ५७६, मावळ १ हजार ३५२, खेड २ हजार २०८, शिरुर ४ हजार ७२९, आंबेगाव १ हजार ३५१, इंदापूर ९ हजार २३१ , वेल्हा ४१९, जुन्नर २ हजार १५५, बारामती ८ हजार ५७८, पुरदंर ३ हजार १४३ आणि दौंड १० हजार ६५३ तालुक्यात तसेच राष्ट्रीय व इतर बँकेमार्फत २ हजार ३९७ असे एकूण ५० हजार ४४८ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील ३ हजार १०७, पाटण १ हजार ८८६, महाबळेश्वर १९४ , जावळी ६९८, वाई ८४१, खंडाळा १ हजार ३७१, फलटण ४ हजार ४९३, माण ३ हजार ८०१, खटाव २ हजार ९५३, कोरेगांव ४ हजार १२४ आणि सातारा तालुक्यातील १ हजार ९५६ एकूण २५ हजार ४२४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील ७५, दक्षिण सोलापूर १२५, पंढरपूर ५५८, सांगोला २७६, माळशिरस ५९८, बार्शी १६७, करमाळा ४५७, मोहोळ ३४२, माढा ३४८, अक्कलकोट ९३ आणि मंगळवेढा ७३७ तसेच राष्ट्रीय व इतर बॅंकेमार्फत १५ हजार ९५५ एकूण १९ हजार ७३१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण कालअखेर पूर्ण झाले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जावून आपले आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. आधार प्रमाणीकरण करुन घेतल्यानंतरच शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात रक्कम जमा होणार आहे तसेच नवीन पीक कर्ज घेण्यासही शेतकरी पात्र होणार आहेत, त्यामुळे आपले आधार प्रमाणीकरण करुन करुन घ्यावे, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



## आता 'मद्या'वरही 'एफडीए'चे लक्ष

### खानपानाच्या गुणवत्तेत तडजोड खपवून घेणार नाही; तुकाराम मुंढे यांचा इशारा

■ पुणे (दै. संध्या)

'खाद्यपदार्थांप्रमाणेच मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांमध्ये भेसळीच्या तक्रारी वाढल्या असून, गावठी दारूमध्ये विषारी रसायन मिसळल्याने मृत्यू झाल्याच्या घटना पुण्यात घडल्या आहेत. पेयजलांची गुणवत्ता, त्याचे उत्पादन आणि लेबलिंग यावर आमचे बारकाईने लक्ष आहे. दूध, पनीर, खाद्यतेलांप्रमाणेच 'अल्कोहोलिक' आणि 'नॉन अल्कोहोलिक' पेयांचीही तपासणी करणार असून, खानपानाच्या गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही,'असा खरमरीत इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शनिवारी दिला. 'प्रत्येक तरुणाने स्वतःची स्वप्ने, सद्विवेक आणि अंतरात्म्याला 'फॉलो' केले पाहिजे. केवळ प्रवाहासमवेत न वाहता समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत,' अशा प्रेरक शब्दांत त्यांन 'जेन झी' पिढीला 'बी युवरसेल्फ'चा मंत्र देखील दिला. 'पुणे लोकल' आणि 'माय जनसेवक' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'भविष्यवेध - संवाद भविष्याचा' या उपक्रमांतर्गत 'अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखत कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी मुंढे यांची मुलाखत घेतली. तुकाराम मुंढे यांचे वरिष्ठ बंधू अशोक मुंढे, विश्वेश्वर बँकेचे अध्यक्ष सुनील गाडवे, वी फाऊंडेशनच्या शामला देसाई, आम्रपाली चव्हाण, दिनेश कदम आदी उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी आपल्या बालपणापासूनचा खडतर प्रवास, यूपीएससीतील अपयश आणि यश, प्रशासकीय कारकीर्दीतील कठोर निर्णय आणि अन्न सुरक्षेशी संबंधित धोरणांवर मनमोकळे भाष्य केले.

'खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. चरबीयुक्त, खारट आणि साखरयुक्त पदार्थ खाल्याने उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणासारखे आजार होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळेच कायद्याने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणेच खाद्यपदार्थ असले पाहिजेत. भेसळयुक्त अन्न, विषारी ताडी-दारू आणि निकृष्ट अन्नपदार्थ नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. 'एफडीए'ने तक्रारींसाठी टोल-फ्री क्रमांक सुरू केला असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हायकोर्टाच्या कँटीनपासून ते शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वत्र नियमानुसारच तपासणी सुरू आहे. अन्न उद्योगाने नियमांचे पालन करणे, एफडीएने नियमन करणे आणि ग्राहकांनी सजग राहणे यातूनच ही व्यवस्था बदलेल,' असे आवाहन मुंढे यांनी केले.

तरुणाईला मार्गदर्शन करताना मुंढे म्हणाले, 'फक्त यशाकडे पाहू नका, तर अपयशातूनही शिकण्याचा प्रयत्न करा. कोणाचे अंधानुकरण करू नका, तर प्रत्येकाकडून चांगले गुण शिका आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. डिजिटल युगात तरुण पिढीचा 'अटेंशन स्पॅन' अवघ्या आठ सेकंदाचा झाला आहे आणि स्क्रीन टाइम ८-९ तासांवर गेला आहे. त्यामुळे केवळ सोशल मीडियावर रील्स स्क्रोल करू नका, तर विचार करा. कष्टाची तयारी ठेवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. प्रवाहातील लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे वाहून न जाता जिवंत माणसाप्रमाणे ध्येयाकडे वाटचाल करा. परिस्थिती कशीही असली, तरी तुमचे भविष्य हे तुम्ही आज घेतलेल्या निर्णयांवरच अवलंबून असते.' कार्यक्रमाच्या उत्तरार्धात अरविंद जगताप यांनी तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय प्रवासावर आणि व्यतिमत्त्वावर लिहिलेल्या विशेष पत्राचे भावनिक वाचन केले. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अशोक मुंढे आणि अमित रुके यांनी मनोगत व्यक्त केले. विरेश आंधळकर यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. "बीए झाल्यानंतर एमए राज्यशास्त्र प्रवेशासाठी मी पहिल्यांदाच 'लालपरी' एसटीने पुण्यात आलो होतो. शिवाजीनगर बसस्थानकावरून पुणे विद्यापीठात पायी गेलो. प्रवेश मिळत होता, परंतु वसतिगृह उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या सायंकाळी मला निराश होऊन परत जावे लागले. नंतर यूपीएससीच्या तयारीदरम्यान जयकर ग्रंथालय आणि रानडे इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयात अभ्यास केला. मित्राच्या खोलीवर 'पॅरासाईट' म्हणून राहताना ढेकणांमुळे रात्र-रात्र झोप यायची नाही. त्या काळात चायनीज गाड्यांवर मी आयुष्यात पहिल्यांदा चायनीज खाल्ले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'एमए' करताना परिस्थितीमुळे ऑम्लेट-पाव आणि फरसाण-केळी हेच 'स्टेपल डाएट' होते. आता मी ते 'स्ट्रीटफूड' खाल्ले तर माझा घसा बसेल,' अशी आठवण तुकाराम मुंढे यांनी सांगताच सभागृहात एकच हशा पिकला. तुकाराम मुंढे यांच्या बदलीच्या प्रतिमेशी जोडलेला एक रंजक किस्साही यावेळी समोर आला. 'ताडसुर्णा गावातील शाळेत आठवीत असताना भूगोलाचा एकही धडा शिकविला जात नसल्याची तक्रार आम्ही शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली होती. 'आम्हाला या शिक्षकाची बदली पाहिजे,' असा 'आदेश' असे लिहिलेला अर्ज आपण केला होता आणि त्यानंतर त्या शिक्षकाची बदलीही झाली,' अशी आठवण त्यांनी सांगितली. कोणत्याही व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. व्यवस्थेने नियमांनुसार काम केले पाहिजे. अधिकारी येतील-जातील; मात्र व्यवस्था व्यवस्थित चालण्यासाठी उत्तरदायित्व आणि कार्यपद्धतीची संस्कृती विकसित झाली पाहिजे. त्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसमवेत नागरिकांचेही योगदान महत्त्वाचे आहे.

### बीयर आणू का?' या प्रश्नाने दिल्ली सोडली

'यूपीएससी'च्या तयारीदरम्यान १९९६ मध्ये पहिल्यांदा दिल्लीला गेल्याचा किस्साही त्यांनी सांगितला. 'दिल्लीतील जवाहर बुक डेपोमधून पुस्तके घेतल्यानंतर पहाडगंजमधील एका हॉटेलमध्ये थांबलो होतो. त्यावेळी वेटरने 'बीयर आणू का?' असे विचारताच मला संताप आला. मी तातडीने बॅग पॅक केली आणि रेल्वे स्थानक गाठले. तिकीट नसतानाही कर्नाटक एक्स्प्रेसचे जनरल तिकीट काढून टॉयलेटजवळ बसत भुसावळपर्यंत प्रवास केला आणि तेथून बसने संभाजीनगर गाठले,' असे त्यांनी सांगताच सभागृहाने टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

### बदल्यांचा त्रास होत नाही

वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे मला त्रास होत नाही. उलट बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग असून, माझ्या जितक्या जास्त बदल्या होतील, तितके अधिक सकारात्मक बदल घडतील,' अशी रोखठोक भूमिका तुकाराम मुंढे यांनी मांडली.

दैनिक संध्या
रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



### मसाई पठारवर स्टंटबाजी, वन विभागाने पाच जणांना ठोठावला ११ हजाराचा दंड

**कोल्हापूर : दैनिक संध्या**

कोल्हापूरच्या मसाई पठारावर सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी दुचाकी आणि चारचाकी वाहनांनी चालवलेले स्टंट्स भूभागावर गंभीर पर्यावरणीय परिणाम करत आहेत, ज्यामुळे पर्यावरणप्रेमी चिंतित आहेत. याच्या परिणामी, पन्हाळा वन विभागाने नुकत्याच कारवाईत पाच व्यक्तींवर ११,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. संवेदनशील गवताळ परिसंस्थेच्या संरक्षणाची तातडीची गरज या प्रकारामुळे अधोरेखित झाली आहे. दरम्यान, वन विभागाने सोशल मीडियावरील व्हिडीओंची दखल घेत सूरज प्रकाश पाटील (रा. निवडे, ता. पन्हाळा), सुमित हिंदुराव गुरव, (रा. सोनुर्ले ता. शाहूवाडी), रोहित सुनील जाधव, (रा. कोलोली, ता. पन्हाळा), सूरज मारुती पाटील, (रा. नांदगाव, ता. शाहूवाडी) आणि सिद्धिराज ज्ञानदेव पाटील (रा. निवडे ता. पन्हाळा) या पाच जणांवर कारवाई करत ११ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. पश्चिम घाटातील महत्त्वाचे गवताळ जैवविविधता क्षेत्र असलेल्या मसाई पठारावर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये रानफुले, दुर्मीळ वनस्पती आणि सूक्ष्म जीवसृष्टी बहरते. मात्र, ऑफ-रोड ड्रायव्हिंगमुळे नाजूक वनस्पती तुडवल्या जात असून जमिनीचा नैसर्गिक पोत बदलत आहे. त्यामुळे केवळ मसाई पठारावर आढळणाऱ्या लव्हाळवर्गीय, कंदवर्गीय, दुर्मीळ ऑर्किड्स आणि कीटकभक्षी वनस्पतींसह संपूर्ण नैसर्गिक जीवनसाखळी धोक्यात येत असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

### कोल्हापूर उत्तरमधून ८० हजारांवर नावे यादीतून उडण्याची शक्यता

**कोल्हापूर : दैनिक संध्या**

विशेष मतदार पुनरीक्षण मोहिमेंतर्गत कोल्हापूर उत्तरमध्ये अजूनही ९२ हजार २५९ मतदारांचे गणना अर्ज भरून आलेले नाहीत. १६ हजार ७८७ मतदारांचे निधन झाले आहे. विधानसभा मतदारसंघाचे काम ६९.७९ टक्के पूर्ण झाले असून, साधारण ८० हजार मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता सरकारी सूत्रांनी व्यक्त केली आहे. निवडणूक आयोगाच्या वतीने नव्याने मतदार यादी बनविली जात असून, कोल्हापूर उत्तर या शहरी भागात बीएलओंना अधिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या भागात मोठ्या प्रमाणात नागरिक स्थलांतरित होतात, शहरी नागरिकांमध्ये कायमच मतदानाबद्दल उदासीनता आहे. अनेकजण परगावी असतात. दिवसभर नोकरी, व्यवसायासाठी जातात. घर बंद असते तर अनेक भागात बीएलओदेखील पोहोचलेले नाहीत. या कारणांमुळे अजूनही ९२ हजार मतदारांचे गणना अर्ज कार्यालयाकडे आलेले नाहीत. निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी मुदतवाढ दिली असली तरी अजून तसे आदेश न आल्याने नोंदणी अधिकाऱ्यांनी हे काम रविवारपर्यंत संपविण्याच्या सूचना बीएलओंना केली आहे.

### सांगली जिल्ह्यातील अडीच लाख विद्यार्थी उपाशी

**सांगली : दैनिक संध्या**

शालेय पोषण आहारासाठी धान्य पुरवठा करणाऱ्या कंपनीचा शासनासोबतचा करार ३१ मार्चला संपला आहे. त्यानंतर नवीन करार अद्याप होऊ शकला नाही. परिणामी शाळांचा पोषण आहार नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच ठप्प झाला आहे. जिल्ह्यातील अडीच लाख विद्यार्थ्यांना दुपारच्या जेवणापासून वंचित राहावं लागत आहे. जिल्हा परिषदेच्या १६८२ शाळांतील विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत पोषण आहार पुरवला जातो. याशिवाय मान्यताप्राप्त खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनाही या योजनेस लाभ मिळतो. या शाळांना धान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराचा करार ३१ मार्चला संपला आहे. त्यानंतर नवीन पुरवठा करणाऱ्या कंपनीची निवड प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. करार संपल्याने जूनपासून धान्य पुरवठा विस्कळीत झाला आहे. काही शाळांनी शिल्लक धान्यातून विद्यार्थ्यांचे पोट भरले, तर काही शाळांमध्ये लोकसहभागातून पोषण आहार पुरविण्याचा प्रयत्न सुरू आहे. या योजनेंतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरवला जातो. शासनाच्या निर्णयानुसार भारतीय अन्न महामंडळाकडून प्रतिकिलो दीड रुपये दराने तांदूळ खरेदी करून शाळांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ठेकेदारांवर आहे. तांदळासोबत मूग डाळ, मसूर डाळ, हरभरा, चवळी, मटकी, मूग, वाटाणा, तूर डाळ, सोयाबीन तेल, कांदा-लसूण मसाला, हळद पावडर, मीठ, जिरे, मोहरी, मिरची पावडर, गरम मसाला आणि सोयाबीन वडी या साहित्याची पोषण आहारासाठी गरज आहे. तांदूळ वगळता अन्य साहित्य स्थानिक स्तरावरून उपलब्ध करण्यात येत आहे. तांदळाचा पुरवठा मात्र शासनाकडून होणे अपेक्षित आहे. तांदूळ संपलेल्या शाळांनी लोकसहभागातून तो उपलब्ध करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पण ठेका कधी निश्चित होईल व पुरवठा कधी सुरू होईल, याची कोणतीही निश्चिती नाही. त्यामुळे लोकसहभाग किती दिवस पुरणार, हा प्रश्न आहे. विशेषतः मोठ्या पटसंख्येच्या शाळांना मोठ्या प्रमाणात लोकसहभाग मिळवताना कसरत करावी लागत आहे. धान्य पुरवठ्याचे कंत्राट संपल्याने पुरवठा थांबला आहे. शासनाकडून कंत्राटदार निश्चित होण्याची प्रतीक्षा आहे.

### सांगली बाजार समिती त्रिभाजनावर संचालकांत फूट, बैठकीकडे जिल्ह्याचे लक्ष

**सांगली : दैनिक संध्या**

सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे त्रिभाजन करून जत आणि कवठेमहांकाळ येथे स्वतंत्र बाजार समित्या स्थापन करण्याच्या शासन निर्णयावरून विद्यमान संचालकांमध्ये उघडी फूट पडली आहे. समितीतील १८ संचालकांपैकी १५ संचालकांनी त्रिभाजनाला विरोध केला आहे, तर तीन संचालकांनी समर्थन दिले आहे. त्यामुळे शनिवारी, दि. ८ ऑगस्ट रोजी कवठेमहांकाळ येथे होणाऱ्या बैठकीत कोणती भूमिका घ्यायची, याबाबत शेतकरी, व्यापारी आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सांगली बाजार समितीचे कार्यक्षेत्र मिरज, जत आणि कवठेमहांकाळ या तीन तालुक्यांपर्यंत विस्तारलेले आहे. समितीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), भाजप आणि शिवसेना अशा सर्वपक्षीय सदस्यांचा समावेश आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांत जिल्ह्याच्या राजकारणात झालेल्या बदलांचा परिणाम बाजार समितीच्या राजकारणावरही दिसून येत आहे. तत्कालीन काँग्रेसच्या नेत्या व जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्रीताई पाटील आणि संचालक पृथ्वीराज पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजपचे आमदार सुधीर गाडगीळ, सुरेश खाडे आणि गोपीचंद पडळकर यांनी त्रिभाजनाचे समर्थन केले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे आमदार जयंत पाटील, काँग्रेसचे खासदार विशाल पाटील, जिल्हाध्यक्ष विक्रमसिंह सावंत आणि कवठेमहांकाळचे माजी मंत्री अजितराव घोरपडे यांनी त्रिभाजनास विरोध दर्शविला आहे.

# चंबामध्ये भीषण अपघात; बस दरीत कोसळली

**■ चंबा (दै. संध्या)**

हिमाचल प्रदेशच्या चंबा जिल्ह्यात एक भीषण अपघात झाला आहे. बैरागढ-चंबा मार्गावर देवीकोठीजवळील चालुज वळणावर २२ प्रवासी असलेली एक खासगी बस अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बसचालक आणि कंडक्टरसह बसमध्ये एकूण २२ नागरिक प्रवास करत होते. बस देवीकोठीजवळील चालुज वळणावर पोहोचताच अचानक चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं आणि बस थेट खोल दरीत जाऊन कोसळली.

हिमाचल प्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. मान्सूनच्या सुरुवातीपासून आतापर्यंत पावसाशी संबंधित वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये ६४ जणांना आपला जीव गमवावा लागला असून, १४ ठिकाणी भूस्खलनाच्या घटना नोंदवल्या गेल्या आहेत. हवामान खात्याने राज्यातील मुसळधार पावसाची स्थिती पाहता १२ ऑगस्टपर्यंत 'अलर्ट' जारी केला आहे.



# काँग्रेसने जारी केला व्हीप; विरोधकांनी काय आखला प्लॅन?

**■ नवी दिल्ली (दै. संध्या)**

देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबई दौऱ्यावर आले आहेत. संसदेचे पावसाळी अधिवेशन दिल्लीत सुरू आहे. या पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा आठवडा मोठ्या गदारोळाचा ठरण्याची शक्यता आहे. काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्ष परदेशी फंडिंग सुधारणा विधेयक (FCRA) च्या मुद्द्यावरून सरकारला घेरण्याची तयारी करत आहे. शुक्रवारी दुपारी, काँग्रेसने आपल्या सर्व लोकसभा खासदारांना १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश देणारा तीन ओळींचा व्हीप जारी केला. इतर विरोधी पक्षही लवकरच हे पाऊल उचलतील बोलले जाते.

१० ऑगस्ट रोजी लोकसभेत FCRA सुधारणा विधेयक सादर होण्याची शक्यता आहे. हे विधेयक गृह मंत्रालयाशी संबंधित असल्याने यावेळी गृहमंत्री अमित शाह सभागृहात उपस्थित राहतील अशी विरोधी पक्षांना आशा आहे. शुक्रवारी सकाळी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या कार्यालयात झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत काँग्रेस नेतृत्वाने आपल्या मित्रपक्षांना सोमवारपासून त्यांचे सर्व खासदार सभागृहात पूर्ण ताकदीनिशी उपस्थित राहतील याची खात्री करण्याचा सल्ला दिला. पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच २० जुलै रोजीच्या संसद मोर्चावेळी आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईबाबत अमित शाह यांनी सभागृहात निवेदन द्यावे अशी मागणी विरोधी पक्ष करत आहेत. या मुद्द्यामुळे अधिवेशनात अनेकदा कामकाज ठप्प झाले आहे. तसेच आम्ही पुढील आठवड्यात होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना आणि एफसीआरए विधेयकांसाठी तयार आहोत. गृहमंत्री १२ दिवसांपासून सभागृहात गैरहजर आहेत हे आम्हाला माहिती आहे. आता सरकार देशात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करतील असा आरोप काँग्रेसचे लोकसभा प्रतोद मणिकम टागोर यांनी केला. एफसीआरए विधेयकावरून बराच वाद निर्माण झाला आहे. विशेषतः ख्रिश्चन संघटना विधेयकातील एका तरतुदीबद्दल चिंतित आहेत. जी तरतूद सरकार-नियुक्त प्राधिकरणाला ज्या संस्थांची एफसीआरए नोंदणी कालबाह्य झाली आहे, त्यांची मालमत्ता ताब्यात घेण्याची परवानगी देते. हे विधेयक भाजपासाठी राजकीयदृष्ट्या संवेदनशील आहे कारण अनेक चर्च आणि ख्रिश्चन संस्था परदेशी देणग्यांमधून बांधल्या गेल्या आहेत आणि त्या एफसीआरएच्या अंतर्गत येतात. भाजपा विशेषतः केरळसारख्या राज्यांमध्ये ख्रिश्चनांमध्ये आपला पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न करत आहे, त्यामुळे या चिंता दूर करण्यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. या विधेयकात कुठलीही पूर्वलक्षी दंडात्मक तरतूद नाही असं सरकारने म्हटलं आहे. गुरुवारी मिझोरामचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी अमित शाह यांची भेट घेतली आणि विधेयकाबाबत आपली चिंता व्यक्त करणारे एक निवेदन सादर केले. गृहमंत्री यांनी त्यांना आश्वासन दिलंय की हे विधेयक १२ ऑगस्ट रोजी लोकसभेत मांडले जाईल आणि त्यात कोणतीही पूर्वलक्षी कलमे समाविष्ट नसतील असं लालदुहोमा यांनी माध्यमांना सांगितले.

#### सपा आणि टीएमसीची भूमिका काय?

विरोधी इंडिया आघाडीतील इतर पक्षही या मुद्द्यावर काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे दिसत आहे. समाजवादी पक्षाच्या एका वरिष्ठ खासदाराने स्पष्ट केले की, त्यांचा पक्ष विरोधी पक्षांच्या सामूहिक अजेंड्याला पाठिंबा देईल. आम्ही विरोधी पक्षांसोबत आहोत आणि यापुढेही राहू. गरज पडल्यास जरी आमचे सर्व खासदार सभागृहात आधीच उपस्थित असले तरी आम्ही व्हीपही जारी करू. सरकार अमित शाह यांच्याऐवजी केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांना विधेयकावर चर्चा करण्यासाठी पाठवू शकते अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली. तर आम्हीही आमच्या सर्व खासदारांना सोमवारपासून सभागृहात उपस्थित राहण्यास सांगितले आहे. काही पक्ष औपचारिक व्हीप जारी करतात तर काही अनौपचारिक सूचना देतात असं टीएमसीच्या खासदाराने म्हटलं.

# १५ नातेवाईकांना घातला कोट्यवधींचा गंडा

**■ उत्तर प्रदेश (दै. संध्या)**

उत्तर प्रदेशच्या गोरखपूरमध्ये एक चक्रावून टाकणारा प्रकार समोर आला आहे. अब्जाधीश होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या एका रेल्वे अधिकाऱ्याच्या मुलीने दोन महिन्यांत १०० कोटी रुपये कमवण्याच्या नादात स्वतःच्या नातेवाईकांसह अनेक लोकांची मोठी फसवणूक केली आहे. यामध्ये तिच्या रेल्वे अधिकारी असलेल्या वडिलांनीही तिची पूर्ण साथ दिली. मात्र श्रीमंत होण्याच्या या हव्यासापोटी गोरखपूरचे स्टेशन अधीक्षक वडील आणि त्यांची मुलगी आता थेट जेलमध्ये पोहोचले आहेत.

गरिमा सिंहने तिच्या डायरीत अब्जाधीश बनण्याची थेट 'डेडलाईन'च लिहून ठेवली होती. एप्रिल ते मे दरम्यान १०० कोटी कमवण्याचं तिचं उद्दिष्ट होतं. हेच उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या नादात गरिमाने १० ते १५ जणांना आपल्या जाळ्यात ओढलं. कर्ज माफ करून देण्याच्या नावाखाली तिने लोकांकडून कोट्यवधी रुपये उकळले. या फसवणुकीचे शिकार केवळ बाहेरचे लोकच नाही, तर तिचे स्वतःचे नातेवाईक आणि रेल्वे अधिकारीही ठरले. वडिलांनीही तिला साथ दिली. पोलीस तपासात आतापर्यंत ३.५ कोटींपेक्षा जास्त रुपयांच्या घोटाळ्याचा पर्दाफाश झाला आहे.

"मी गरिमा सिंह, एप्रिल २०२६ पर्यंत अब्जाधीश बनेन, हे माझे ध्येय आहे. माझं सर्व कर्ज एप्रिल ते मे दरम्यान संपेल. एप्रिल ते मे पर्यंत माझे उद्दिष्ट १०० कोटी रुपये कमवण्याचं आहे. गरिमा सिंह करोडपती आहे. देवा, तुझे आभार!" असं तिने डायरीत लिहून ठेवलं होतं.

गरिमाने एका नातेवाईकाची ९१ लाख रुपयांची फसवणूक केली. गरिमाचे वडील रेल्वेत मोठे अधिकारी असल्याने त्यांच्यावर विश्वास ठेवून सर्वांनी मुलीकडून कर्ज काढलं होतं.



# लघुग्रहाला इस्रोचे शास्त्रज्ञ श्रीराम सरण यांचे नाव

**■ कोल्हापूर (दै. संध्या)**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. श्रीराम सरण बैरावरसू यांचे नाव आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघटनेने लघुग्रहाला दिले आहे. हा दुर्मीळ सन्मान त्यांच्या अंतराळ संशोधनातील योगदानासाठी आहे, ज्यामुळे कोल्हापूर आणि भारताच्या विज्ञानक्षेत्राला अभिमानाचा क्षण मिळाला आहे.

आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघटनेच्या वर्किंग ग्रुप फॉर स्मॉल बॉडीज नोमेनक्लेचर (डब्ल्यूजीएसबीएन) ने (२०७३४ श्रीरामसरन १९९९ एक्स ए १६९) हे नाव अधिकृतपणे जाहीर केले. चंद्र, लघुग्रह आणि इतर ग्रहांच्या पृष्ठभागावरील रेजोलिथ तसेच ग्रह रडार संशोधनातील त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

सध्या डॉ. सरण हे इस्रोच्या अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटरमध्ये कार्यरत आहेत. चांद्रयान-२ मोहिमेतील ड्युअल फ्रिक्वेन्सी सिंथेटिक अपर्चर रडार संशोधनात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच इस्रोच्या आगामी व्हीनस ऑर्बिटर मिशनमधील रडार पेलोडचे विज्ञानप्रमुख म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. डॉ. श्रीराम सरण यांच्या पत्नी डॉ. रेवती सरण (पूर्वाश्रमीच्या डॉ. रेवती मोरे) या कोल्हापूरच्या आहेत.

# भीषण आगीत जळालेले ऐतिहासिक 'केशवराव' २१ महिन्यांत पुन्हा उभे, लोकार्पणास सज्ज

**■ कोल्हापूर (दै. संध्या)**

येथील ऐतिहासिक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाच्या वास्तूचे उद्या, शनिवारी पुन्हा एकदा नव्या जोमाने लोकार्पण होत आहे. आगीच्या भक्षस्थानी पडलेली ही वास्तू जशी होती, तशी किंबहुना त्याहून अधिक आकर्षक रूपाने सजलेली तसेच अत्याधुनिक सुविधांनी नटलेली ही वास्तू २१ महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर उभी राहिली आहे.

ऐतिहासिक केशवराव भोसले नाट्यगृहाला दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री साडेनऊ वाजता आग लागली. या भयंकर आगीत नाट्यगृहाचे छत संपूर्णपणे जळून खाक झाले, तसेच भिंतींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेला आज, शुक्रवारी दोन वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच अत्याधुनिक साऊंड व इलेक्ट्रॉनिक सुविधा असणारी वातानुकूलित वास्तूचे लोकार्पण उद्या, शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे. सर्व यंत्रणा, निधी असला की एखादी इमारत काही महिन्यांत सहज उभी राहू शकते. परंतु, केशवराव भोसले नाट्यगृहासारखी अत्यंत देखणी आणि हेरिटेज वास्तूमध्ये समावेश असल्याने ती जशी होती तशी उभारण्याचे एक मोठे आव्हान राज्यातील नामवंत अभियंत्यांनी, महानगरपालिका अधिकाऱ्यांनी मेहनतीने पेलले. कोल्हापूरकरांची तळमळ, रंगकर्मींच्या भावना, सरकारची सकारात्मकता आणि महापालिकेसह येथील लोकप्रतिनिधींनी घेतलेला पुढाकार अशा सामूहिक प्रयत्नातून अशक्य वाटणारी वास्तू आज पुन्हा एकदा नव्या नवरीसारखी नटलेली आहे. रंगकर्मींच्या डोळ्यातून वाहिलेल्या अश्रूंची फुले झाली आहेत. ८ ऑगस्ट २०२४ रोजी लागलेल्या आगीनंतर एक वर्षात ही वास्तू उभी करण्याचा संकल्प करण्यात आला. परंतु, पोलिस चौकशी, विमा कंपनीचे पंचनामे यात तब्बल दोन महिने सरले. त्यानंतर इमारतींच्या भिंतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून भिंतीचे काही भाग उतरविणे आवश्यक होते. त्यातही वेळ गेला. दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी सात वाजता वास्तूच्या पुनर्बांधणीचे काम सुरू झाले. तेव्हापासून आतापर्यंत केवळ २१ महिन्यांत काम पूर्ण करण्यात आले.

# ढोल-ताशांच्या गजरात 'कोल्हापूरच्या राजा'चे जल्लोषात आगमन

**■ कोल्हापूर (दै. संध्या)**

ढोल-ताशांचा दणदणाट, विद्युत रोषणाई आणि हजारो भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत रंकाळावेस येथील गोल सर्कल मित्रमंडळाच्या 'कोल्हापूरच्या राजा' गणेशमूर्तीचे शुक्रवारी सायंकाळी कोल्हापुरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. गणेशोत्सवाला अद्याप सव्वा महिना असतानाच बाप्पाच्या आगमनाने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यंदा या सोहळ्याचे १४ वे वर्ष आहे. लालबागच्या राजाच्या धर्तीवरील ही १३ फूट उंच गणेशमूर्ती मुंबईतील कांबळी चित्रशाळेत मूर्तिकार संतोष रत्नाकर कांबळी यांनी साकारली आहे. शिरोली फाटा (तावडे हॉटेल) येथे सायंकाळी मूर्तीचे आगमन होताच हजारो नागरिकांनी जयघोष करत स्वागत केले. करवीर नाद ढोलपथकाच्या निनादात निघालेल्या मिरवणुकीत उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार राजेश क्षीरसागर, पुष्कराज क्षीरसागर यांनी श्रीफळ वाढवून श्रींचे दर्शन घेतले. मूर्ती आणण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष कुणाल पाटील, रुपेश बागल यांच्यासह पदाधिकारी लालबागला गेले होते. मुस्कान लॉन परिसरात विद्युत रोषणाई आणि बेंजो पॅडच्या तालावर तरुणाईने जल्लोष केला. त्यानंतर मूर्ती मार्केट यार्ड येथे ठेवण्यात आली असून गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला ती रंकाळा स्टँड येथील मंडपात विराजमान होणार आहे. तावडे हॉटेल चौकात दुपारपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली होती. अनेकांनी इमारतींवरून तसेच झाडावरुन गणेशाचे दर्शन घेतले. २५ हून अधिक ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून आगमन सोहळ्याचे चित्रीकरण केले. मोबाइलवर फोटो आणि थेट प्रक्षेपण करण्यासाठी तरुणाईची मोठी लगबग दिसून आली. लहान मुलांसह महिलांचाही मोठा सहभाग होता. गर्दीचा अंदाज घेऊन पोलिसांनी एकेरी वाहतूक व्यवस्था लागू केली होती. मात्र दुतर्फा वाहनांची गर्दी झाल्याने वाहतुकीवर ताण निर्माण झाला. सांगली फाटा, उजळाईवाडी, शिवाजी विद्यापीठ मार्ग तसेच महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी शहरातील सर्व पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी, गृहरक्षक दल, राज्य राखीव दलासह पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता.



## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपळे गुरवमधील स्मशानभूमीत रॅम्पऐवजी पायऱ्या करण्याची पवार यांची मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपळे गुरव प्रभाग क्र. २९ मधील स्मशानभूमीच्या प्रवेशद्वाराजवळ खांदे बदलीच्या ठिकाणी रॅम्प व पायऱ्यांच्या चुकीच्या रचनेमुळे पावसाळ्यात व इतर वेळीही पाय घसरून अपघात होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महापालिकेच्या स्थापत्य विभागाने येथील रॅम्प काढून टाकून पायऱ्या करणे व पायऱ्या आहेत त्या ठिकाणी अंत्यविधीचे साहित्य घेऊन जाणाऱ्या ॲम्बुलन्स किंवा टेम्पो अशा वाहनांसाठी जागा करणे गरजेचे आहे, अशी मागणी छत्रपती शिवाजी महाराज वनश्री (महाराष्ट्र शासन) वृक्षमित्र राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त अरुण पवार यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. महापालिकेचे स्थापत्य विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी निवेदन स्वीकारले. या संदर्भात अरुण पवार यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की महापालिकेने पिंपळे गुरवमधील स्मशानभूमीचे नूतनीकरण केले. मात्र, यामुळे स्मशानभूमीतील समस्या सुटण्याऐवजी नागरिकांना त्रासच सहन करावा लागत आहे. यामध्ये स्मशानभूमीच्या मुख्य रस्त्याकडील मुख्य प्रवेशद्वाराची रुंदी साधारण २५ फूट आहे. परंतु, अंत्यविधीच्या वेळी अंत्ययात्रा आल्यानंतर वाटेत खांदे बदली करण्यासाठी लोक तिथे थांबतात. तेथील वटा तेथील थांबा व्यवस्थित केलेला आहे पण ज्या ठिकाणी थांबा आहे त्या ठिकाणाहून मयत अंत्यविधी चार खांदेकर यांनी उचलून खांद्यावर घेतल्यानंतर त्या ठिकाणी रॅम्प असल्यामुळे मोठी अडचण निर्माण होते नागरिकांना अंत्यविधीची मयत सुरक्षितपणे अंत्यविधी ठिकाणापर्यंत रॅम वरून पाय घसरत असल्यामुळे कठीण जाते. त्यामुळे स्मशानभूमीजवळ अंत्ययात्रा आल्यानंतर खांदे बदली करण्यासाठी जिथे थांबा आहे, त्या बाजूला तात्काळ रुंद पायऱ्या किंवा टप्पे करण्याची आवश्यकता आहे. तसेच, सध्या ज्या बाजूला अत्यंत छोट्या व अरुंद पायऱ्या आहेत, त्या बाजूला सुधारणा करून तेथून ॲम्बुलन्स गाडी किंवा टेम्पो येण्या-जाण्यासाठी जागा करण्यात यावी, जेणेकरून अंत्यविधीचे साहित्य किंवा इतर वस्तू घेऊन येणारे वाहन सहजपणे आत येऊ शकेल. अरुण पवार यांनी पुढे म्हटले आहे, की स्मशानभूमीत अंत्यविधीच्या वेळी साधारण एक ते दीड हजार नागरिकांची उपस्थिती असते. खांदे बदलीच्या ठिकाणचे रॅम्प काढून टाकून त्या ऐवजी टप्प्याटप्प्याने पायऱ्या केल्यास पाय घसरून पडण्याच्या घटना घडणार नाहीत.



### पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासनाची सकारात्मक भूमिका

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाने दिनांक ३१/०७/२०२६ रोजी दिलेल्या संप नोटीशीच्या अनुषंगाने आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे व संघटनेचे पदाधिकारी व महानगरपालिकेतील सर्व विभागप्रमुख यांची महत्त्वपूर्ण बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीमध्ये कर्मचाऱ्यांच्या हिताच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत कर्मचाऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळाच्या प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. महापालिकेतील सर्व पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना रु.रु. २५,०००/- सानुग्रह अनुदान तसेच ८.३३% बोनस पुढील ५ वर्षांकरीता देण्याबाबतचा करार आठ दिवसांच्या आत पूर्ण करण्याचे ठरले. तसेच महापालिकेच्या सेवा प्रवेश नियमावली संदर्भातही सकारात्मक चर्चा झाली असून अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या विषयावर मा. आयुक्त यांनी स्वतः बैठकीस उपस्थित राहून सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्री. विकांत बगाडे यांच्या माध्यमातून कर्मचारी महासंघाशी चर्चा करुन सदर सेवा प्रवेश नियमावली अंतिम करून एका महिन्याच्या आत शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे निश्चित करण्यात आले. महापालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीवरही सकारात्मक चर्चा झाली असून या विषयासंदर्भात स्वतंत्र समिती गठित करून एका महिन्याच्या आत सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागु करण्यासंदर्भात पुढील निर्णय घेण्याचे बैठकीत ठरले.

### दीपके यांनी इतिहासाचा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा अभ्यास करूनच वक्तव्य करावे

**पिंपरी : दैनिक संध्या**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी तसेच भारताच्या इतिहासाविषयी कोणतेही वक्तव्य करण्यापूर्वी अभिजीत दीपके यांनी वस्तुनिष्ठ अभ्यास करणे आवश्यक आहे. आंदोलनाच्या नावाखाली अराजकता माजवणे, निराधार आरोप करणे आणि प्रसिद्धी मिळविण्यासाठी दिशाभूल करणारी विधाने करणे योग्य नाही, असे प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह-सरकार्यवाह श्री. अतुलजी लिमये यांनी सीजेपी (CJP) आंदोलनासंदर्भात भूमिका मांडल्यानंतर अभिजीत दीपके यांनी केलेल्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना आमदार गोरखे बोलत होते. आमदार अमित गोरखे म्हणाले की, श्री. अतुलजी लिमये यांनी संबंधित आंदोलनाबाबत अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध विवेचन केले. मात्र, त्यावर प्रतिक्रिया देताना अभिजीत दीपके यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी संघाने अवमान केल्याचा आणि महात्मा गांधी यांच्या हत्येत संघाचा सहभाग असल्याचा जुना व निराधार आरोप पुन्हा केला. अशा प्रकारची विधाने करण्यापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास, भारताची संस्कृती आणि संघाचे शंभर वर्षांचे राष्ट्रकार्य यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

# अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासन सकारात्मक

**आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी**

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवा विषयक प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, विविध मागण्यांची टप्प्याटप्प्याने पूर्तता करण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यवाही गतिमान करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त कार्यालयात आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, उपायुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे यांच्यासह कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची पदोन्नती, सेवा ज्येष्ठता, जुनी पेन्शन योजना, सेवा प्रवेश नियम, आकृतीबंध, धन्वंतरी योजना, आश्वासित प्रगती योजना, आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २० व ३० वर्षांचा लाभ, आगाऊ वेतनवाढ, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज व संगणक कर्ज यांसह विविध मागण्यांबाबतही बैठकीत चर्चा झाली.



तसेच बैठकीमध्ये कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या बोनस बाबतचा करार लवकर करण्याचा निर्णय घेण्यात आला.


आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, "कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक प्रश्न नियमांच्या चौकटीत आणि वेळेत निकाली काढण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही केली जात आहे. प्रत्येक मागणीचा वस्तुनिष्ठ विचार करून ज्या बाबींवर निर्णय घेणे शक्य आहे, त्या प्रकरणांमध्ये विलंब होणार नाही. तसेच संबंधित विभागांनी आवश्यक प्रस्ताव व कार्यवाही तातडीने पूर्ण करून कर्मचारी हिताचे प्रश्न मार्गी लावावेत," अशा सूचना देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी दिल्या.

## हिंजवडीत प्रेमाच्या त्रिकोणातून तरुणाची निर्घृण हत्या

■ पिंपरी (दै. संध्या)

हिंजवडी परिसरात प्रेमसंबंधातील वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात सागर गायकवाड या तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून निकिता दनाने ही तरुणी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे हिंजवडी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दिनेश झांबरे आणि निकिता यांचे शालेय जीवनापासून प्रेमसंबंध होते. दरम्यान, निकिता शिक्षणासाठी पुण्यात आल्यानंतर तिची ओळख सागर गायकवाड याच्याशी झाली. कालांतराने दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्याने दिनेश आणि निकिता यांच्यात दुरावा निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संतप्त झालेल्या दिनेशने हिंजवडीतील एका सात मजली पीजीमध्ये जाऊन निकिता आणि सागर यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. आरोपीने दोघांवर सपासप वार केल्याने सागर गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ उपचारासाठी नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तर निकिता गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपी दिनेश झांबरे याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत प्रेमसंबंधातील वाद आणि मत्सरातून हा हल्ला केल्याचे समोर आले आहे. भरदिवसा घडलेल्या या थरारक घटनेमुळे हिंजवडी आयटी पार्क परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



## खासगी रुग्णवाहिकांच्या मनमानीला लगाम घाला

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी रुग्णवाहिका सेवांकडून आकारल्या जाणाऱ्या मनमानी शुल्कावर नियंत्रण आणण्यासाठी आणि रुग्णवाहिकांचे दर निश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापौर रवि लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक खासगी रुग्णवाहिका चालक आणि सेवा पुरवठादारांकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून मनमानी पद्धतीने भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत आहेत. रुग्णांच्या गंभीर परिस्थितीचा गैरफायदा घेत अवाजवी दर आकारले जात असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

अनेक ठिकाणी रुग्णवाहिकांच्या भाडेदराबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्यामुळे तसेच दरांमध्ये एकसमानता नसल्यामुळे नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गंभीर आजार, अपघात किंवा इतर आपत्कालीन प्रसंगी रुग्णसेवा ही मानवतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची बाब असताना तिचे व्यापारीकरण होणे दुर्दैवी असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने पुढील उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. खासगी रुग्णवाहिकांसाठी किलोमीटरनिहाय व सेवेनिहाय अधिकृत दर निश्चित करावेत. सर्व रुग्णवाहिकांमध्ये दरपत्रक ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करावे. मनमानी दर आकारणाऱ्या चालक व संस्थांवर दंडात्मक कारवाई करावी. नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पलाईन किंवा ऑनलाइन तक्रार निवारण व्यवस्था सुरू करावी. महापालिका क्षेत्रातील सर्व रुग्णवाहिकांची नोंदणी व नियमित तपासणी करण्यात यावी. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करून या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी केली आहे.



## भुमकर चौकाजवळ आलिशान कारला आग

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील भुमकर चौक परिसरात शुक्रवारी दुपारच्या सुमारास एका आलिशान कारला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. भररस्त्यात कारमधून धूर निघू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडून जळून खाक झाली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारमधून अचानक धूर निघत असल्याचे दिसून आले. चालकाने प्रसंगावधान राखत वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले. मात्र, काही क्षणांतच आगीच्या ज्वाला भडकल्या आणि संपूर्ण वाहनाने पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी अग्निशमन दलाला कळविले. माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार वाहनातील शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.



## योगेश आल्हाट व कंपनीविरुद्ध तात्काळ FIR दाखल करा

**आम आदमी पार्टीची आयुक्तांकडे मागणी**

■ पिंपरी (दै. संध्या)

मोशी स्पाईन रोड येथील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्प परिसरात घडलेली इमारत दुर्घटना अत्यंत गंभीर, धक्कादायक व दुर्दैवी आहे. या भीषण दुर्घटनेत ९ निष्पाप नागरिकांचा नाहक बळी गेला आहे. हा प्रकार केवळ अपघात नसून प्रशासकीय निष्काळजीपणा, सुरक्षा नियमांचे सर्रास उल्लंघन आणि कर्तव्यातील गंभीर कसूर यांचा थेट परिणाम आहे. यास जबाबदार अधिकारी, व कंपनीवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी आक्रमक मागणी आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवडच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे.

आम आदमी पार्टीचे युवा अध्यक्ष विकी पासोटे व युवा उपाध्यक्ष विजय चांडाळ यांनी महापालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना यासंदर्भात निवेदन सादर केले.

आम आदमी पार्टीच्या प्रमुख मागण्या: 1 वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाशी संबंधित पर्यावरण विभागाचे श्री. संजय कुलकर्णी, श्री. योगेश आल्हाट, अग्निशमन विभागाचे श्री. ऋषिकेश हिरामण चिपाडे, तसेच संबंधित कंत्राटदार यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) व इतर लागू कायद्यांनुसार तात्काळ FIR नोंदवून कठोर कारवाई करावी. 2) संबंधित कंत्राटदार कंपनीस तात्काळ काळ्या यादीत (Blacklist) टाकण्यात यावे. 3) दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलली जावीत. 4) महापालिका प्रशासनाने या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती 'आप'ला लेखी स्वरूपात कळवण्यात यावी. अशी मागणी आप युवा आघाडीचे उपाध्यक्ष विजय चांडाळ यांनी केली.

# शहरातील सर्व १३ जलतरण तलाव तातडीने सुरू करावेत

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व १३ जलतरण तलाव तातडीने सुरू करण्यात यावेत, या मागणीसाठी शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी उपमहापौर शर्मिला बाबर यांची भेट घेतली. नागरिकांच्या मागणीची दखल घेत उपमहापौर बाबर यांनी ज्येष्ठ नागरिकांना सोबत घेऊन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांची भेट घेतली आणि जलतरण तलाव सुरू करण्याबाबत निवेदन दिले.

यावेळी उपायुक्त पंकज पाटील, ज्येष्ठ नागरिक कैलास तापकीर, डॉ. चंद्रकांत चौधरी, शिवाजी आढाव, प्रमोद शहाणे, राजेंद्र पोतदार, अनिल पवार, मापारी शांतीलाल आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे शहरातील सर्व जलतरण तलाव सध्या बंद असल्याने ज्येष्ठ नागरिक, जलतरणपटू आणि क्रीडाप्रेमी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. जलतरण हा आरोग्य आणि व्यायामासाठी उपयुक्त असल्याने विशेषतः ज्येष्ठ नागरिकांकडून तलाव लवकर सुरू करण्याची मागणी करण्यात येत होती.

दरम्यान, पवना धरण १०० टक्के भरले असून शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्नही



सुटला आहे. त्यामुळे जलतरण तलाव पुन्हा सुरू करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे.

नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन सर्व १३ जलतरण तलाव पूर्ववत सुरू करण्याची सूचना उपमहापौर शर्मिला बाबर यांनी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्याकडे केली.उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या सूचनेची अतिरिक्त आयुक्त जंगम यांनी तत्काळ दखल घेतली. त्यांनी उपायुक्त पंकज पाटील यांना शहरातील सर्व जलतरण तलाव तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने शहरातील ज्येष्ठ नागरिक, जलतरणपटू आणि क्रीडाप्रेमींना मोठा दिलासा मिळणार आहे.जलतरण तलाव सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आखाडात चिकन मटण चे भाव गगनाला

**नारायणगाव : दैनिक संध्या**

आषाढी एकादशी संपताच आणि श्रावण महिना सुरू होण्यापूर्वीच्या काळात सध्या जुन्नर तालुक्यातील अनेक ग्रामीण भागांत 'आखाड पार्ट्यांचा' मोठा धुमधडाका पाहायला मिळत आहे. या काळात मांसाहारी खवय्यांकडून गावरान कोंबड्यांना सर्वाधिक पसंती दिली जात असल्याने, बाजारात गावरान कोंबड्यांची मागणी कमालीची वाढली आहे. मागणी वाढल्याने गावरान कोंबड्यांचे दरही गगनाला भिडून ७०० ते ८०० रुपये किलो वर गेले आहे आहेत. आषाढाच्या सांगतेच्या पार्श्वभूमीवर मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी देवाला कोंबडे किंवा बकरे कापून नवस फेडण्याची जुनी परंपरा पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पाळली जाते. त्यामुळे सध्या गावोगावी आणि घराघरांमध्ये नातेवाईक तसेच मित्रमंडळींना एकत्र जमवून आखाड पार्ट्यांचे आयोजन केले जाते. पावसाळा सुरू असल्याने माशांचा विणीचा हंगाम असतो. या दिवसांत मासे कमी प्रमाणात मिळतात. आखाड पार्टीचा बेत काहीसा खास असावा अन् त्यासोबतीला रसरशीत गावरान कोंबड्याचा ताव असावा, असे नियोजन असणाऱ्यांनी बाजारात तसेच आजूबाजूच्या खेडेगावात फेरफटका मारायला सुरुवात केली असून, 'गावरान कोंबडा' सगळ्यांच्या पसंतीला उतरत आहे. पूर्वी ग्रामीण भागात या काळात बोकड किंवा बकरा वाट्यावर घेण्याची पद्धत होती. मात्र, वाढते दर आणि बदलत्या खाद्यसंस्कृतीमुळे आता अनेकांचा कल गावरान कोंबडीकडे वाढला आहे. गावरान कोंबडीची बिर्याणी, रस्सा, सूप, गावरान मसाल्यातील कोंबडी, कोंबडी-वडे आणि चुलीवरील भाकरी, अशा पारंपरिक पदार्थांच्या मेजवाणीचे बेत आखले जात आहेत. नेहमी ४०० ते ५५० रुपयांना मिळणारा गावरान कोंबडा सध्याच्या दिवसांत थेट ६५० ते ८०० रुपयांपर्यंत विकला जात आहे. या दिवसात गावरान कोंबड्या सोबतच, वनराज कोंबडा देखील चांगलाच भाव खाऊन जात आहे.तरीही खवय्ये हौसेने पैसे मोजून गावरान कोंबड्यांची खरेदी करत आहेत. बाजारात सध्या जिवंत कोंबडी ६०० रुपये नग, तर ब्रॉयलर चिकन २६० रुपये किलो दराने विकले जात आहे. अंड्यांचे दरही प्रति नग १० रुपयांवर पोहोचले आहेत.ग्रामीण तसेच शहरी भागातील सोसायट्यांमध्ये सुट्टीच्या दिवशी, विशेषतः शनिवार आणि रविवारी मांसाहारी जेवणाचे विशेष बेत आखले जात असतात.

### बेल्हे येथे कर्करोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**नारायणगाव : दैनिक संध्या**

बेल्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नुकतेच भव्य कर्करोग तपासणी व मार्गदर्शन शिबिर पार पडले. 'टीजीएच ओंको लाईफ कॅन्सर सेंटर' (तळेगाव दाभाडे) यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.या शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्या स्मिता कणसे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फड, डॉ. शिल्पा भोर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अशा वर्कर्स, आरोग्य कर्मचारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या शिबिरामध्ये नागरिकांची तोंडाचा कर्करोग,घशाचा कर्करोग तसेच स्तनाचा कर्करोग यासंदर्भात प्राथमिक तपासणी करण्यात आली. तसेच नागरिकांना कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. टीजीएच ओंको लाईफ कॅन्सर सेंटर, तळेगाव दाभाडे येथील डॉ. प्रियंका निकम, नम्रता यादव, अनुष्का मॅडम तसेच कर्मचारी वर्गातील राहुल शिंदे व अक्षय कदम यांनी शिबिरामध्ये सहभागी होऊन नागरिक व रुग्णांची तपासणी केली.तसेच उपस्थित नागरिकांना आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य केले. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच कर्करोग तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कर्करोगाचे लवकर निदान झाल्यास उपचाराची दिशा योग्य वेळी ठरविता येते. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याबाबत जागरूक राहून नियमित तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी टीजीएच ओंको लाइफ कॅन्सर सेंटरचे डॉक्टर व कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर्स तसेच सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्याबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### एकुलत्या एक कर्त्या व्यक्तीच्या निधनाने इचके कुटुंबावर आर्थिक संकट

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

वडिलांचे छत्र अवघ्या तीन महिन्यांपूर्वी हरपलेले असतानाच एकुलता एक मुलगा



हरिभाऊ प्रभू इचके (वय ४०) यांचे ही अकाली निधन झाल्याने इचके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कुटुंबाचा एकमेव आधार हरपल्यामुळे त्यांच्या पत्नी व दोन शिक्षण घेणाऱ्या मुलांसमोर उदरनिर्वाह आणि शिक्षणाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. हरिभाऊ इचके हे निष्णात पखवाज वादक होते. नुकतीच त्यांनी पंढरपूरची वारी पूर्ण करून घरी परतल्यानंतर अचानक प्रकृती बिघडली आणि त्यांचे दुर्दैवी निधन झाले. या घटनेमुळे संपुर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून इचके कुटुंबावर आभाळ कोसळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.पत्नी ललिता इचके यांच्यावर आता संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आली आहे. आधी आजी-आजोबांचे व आता घरातील एकमेव कर्त्या पुरुषाचे ही निधन झाल्याने या कुटुंबाला आधार देणारे कोणीही उरलेले नाही. त्यामुळे मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू राहावा यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि सेवाभावी नागरिकांनी आर्थिक मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सोपानराव वागदरे, वर्गमित्र अनिलकुमार रायकर आणि फौजी मित्र दत्तात्रय इचके यांनी केले आहे. "थेंबे थेंबे तळे साचे" या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने आपल्या परीने मदतीचा हात पुढे करून या दुःखी कुटुंबाला नव्याने उभे राहण्यासाठी बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुक दात्यांनी खालील बँक खाते क्रमांक, IFSC कोड किंवा स्कॅनर (QR Code) च्या माध्यमातून किंवा 9881896843 या मोबाईल क्रमांकावर आर्थिक मदत पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोमतवाडीत जनजागृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ नारायणगाव (दै. संध्या)

सावरगाव येथील शासकीय कन्या आश्रमशाळेत हवामान बदल आणि वनसंवर्धनाविषयी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हवामानात सातत्याने होणारे बदल आणि जैवविविधतेचे धोके लक्षात घेता, सद्यस्थितीत वनसंवर्धन व योग्य व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे. भारतीय वनीकरण संशोधन व शिक्षण परिषद, देहरादून यांच्या संयुक्त विद्यमाने रिकॅप ४ एनडीसी' प्रकल्पांतर्गत हे अभियान राबवण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थिनींना वनसंवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि हवामान बदलाचे निसर्गावर होणारे परिणाम याविषयी सखोल व रंजक माहिती देण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा हा संदेश केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता, विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी निबंध व चित्रकला स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे भाग घेत आपली कला सादर केली. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व बक्षिसे देण्यात आली.

अन्नपूर्णा सेवाभावी संस्थेने महाराष्ट्र वनविभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली या विशेष मोहिमेचे आयोजन केले होते. या



संपूर्ण अभियानाला डॉ. आर. एस. रावत, प्रमोद सावंत, मयूर सूर्यवंशी, डॉ. शिल्पा गौतम, मनीषा महाजन, एन. पी. एस. नयन, माधवी देशपांडे, बळीराम घोलप, राजीव यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या जनजागृती मोहिमेचा एक भाग म्हणून शाळा परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित तज्ज्ञांनी विद्यार्थिनींना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्त्व पटवून दिले. यावेळी शाळेच्या प्राचार्या उज्वला हिले, राजेशकुमार चव्हाण, संभाजी सूर्यवंशी, प्रशांत घुगे, गणेश गोडसे, प्रवीण नाळे, वसंत गर्जे,समीर पठाण, दत्तात्रय डुकरे, अंकुश असवले, सागर शिंदे, माणिक चकवे, ज्ञानेश्वर भालेकर, राजेश म्हस्के, हरीश गायकवाड, शरद ताटे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## विद्याव्हॅली प्रशालेत ज्ञान, संस्कृती व विज्ञानाचा अनोखा संगम

■ चाकण (दै. संध्या)

येथील विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल मध्ये राष्ट्रीय हातमाग दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रार्थना सभेत राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला. श्रेया पवार आणि दिव्यांश खुशवाह या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय हातमाग दिनाचे महत्त्व, भारतीय हातमाग उद्योगाचा इतिहास, या संकल्पनेविषयी माहिती दिली. राजवर्धन केदारी याने हातमाग वस्त्रांचे पर्यावरणपूरक महत्त्व विद्यार्थ्यांनी सांगितले. जय वायाळ याने प्रेरणादायी सुविचार मांडला, तर श्रावणी शेवाळे हिने प्रमुख भूमिका सादर केल्या. कार्यक्रमाची सांगता आरुची देसले हिने पर्यावरण संरक्षण प्रतिज्ञेने केली. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भारतातील प्राचीन तसेच आधुनिक महान शास्त्रज्ञ व संशोधकांची वेशभूषा करून त्यांची भूमिका प्रभावीपणे सादर केली. एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेचे संस्थापक साहेबराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख व मुख्याधिकारी रोहिणी देशमुख यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

महर्षी कनाद, महर्षी आर्यभट्ट, सुश्रुत, चरक, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, थॉमस एडिसन आणि मेरी जॅक्सन यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचे जीवनकार्य, विज्ञानातील योगदान आणि मानव कल्याणासाठी केलेले कार्य विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने मांडले.

या दोन्ही उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक वक्तृत्व कौशल्य, आत्मविश्वास, सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान आणि स्वदेशी उत्पादनांविषयी जागरूकता निर्माण झाली. तसेच ज्ञान, जिज्ञासा, नवोपक्रमाची आवड आणि स्थानिक कारागिरांप्रती आदरभाव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा उद्देश सफल झाला.

पूर्वी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्या स्वाती रणदिवे यांनी सर्वांचे आभार मानले.




## भाकरीचा चंद्र शोधणाऱ्या गरिबांना मायेचा ओलावा द्या : मनोहर शेवकरी



■ चाकण (दै. संध्या)

दिवसेंदिवस महागाई मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. या महागाईच्या काळात गरिबांना एक वेळचे जेवण मिळणे अशक्य झाले असून भाकरीचा चंद्र शोधणाऱ्या गरिबांना मायेचा ओलावा द्या, असे विचार अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सल्लागार मनोहर शेवकरी यांनी व्यक्त केले.

चाकण येथे अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मानस मैत्री फाऊंडेशन, बालरंगभूमी यांच्या माध्यमातून येथील कातकरी वस्ती व ठाकरवाडीत शालेय विद्यार्थी, गरीब नागरिक व महिलांना खाऊ वाटप करून सन्मान करण्यात आला. यावेळी शेवकरी यांनी आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी मानस मैत्री फाऊंडेशनचे संचालक शामराव राक्षे, बाल रंगभूमीचे कार्याध्यक्ष नारायण करपे, राम तांबे, रत्नेश शेवकरी, ओंकार पडवळ, आर्या राक्षे, अपेक्षा राक्षे, गणेश बहिरट आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवकरी पुढे म्हणाले, कातकरी वस्तीतील मुले शिकली पाहिजेत. मोठी होऊन त्यांनी कुटुंबाची जबाबदारी घेतली पाहिजे. भविष्यकाळात ठाकरवाडी व कातकरी वस्ती येथील लेकरांना मदतीचा दिला जाईल. गरिबांना सहकार्य करण्याकरता सेवाभावी संस्था व संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज आहे." नारायण करपे यांनी सूत्रसंचालन केले. श्यामराव राक्षे यांनी आभार मानले.

## वारकरी शिक्षण संस्थेला कौटुंबिक साहित्यांचे दान



■ चाकण (दै. संध्या)

देणाराने देत जावे, घेणाराने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाराचे हात घ्यावे हे ब्रीद सत्यात उतरवणारे येथील चाकण लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वसंत मुटके व मनिषा बाळासाहेब मुटके यांनी सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून येथील एका वारकरी शिक्षण संस्थेला कौटुंबिक साहित्यांचे दान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

रामधाम वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, असे या संस्थेचे नाव आहे. तेल डबा, पाच स्टीलचे हंडे, तीन कळशा दान केल्या आहेत.

हभप. विशाल महाराज व उद्योजक उल्हास शिर्के यांच्या उपस्थितीत हे साहित्य दान करण्यात आले. या अभिनव उपक्रमाचे चाकण पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

## वसुंधरा शिवाजी शितोळे-भोसले यांना सावित्रीबाई पीएच.डी. प्रदान

■ बारामती (दै. संध्या)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील इंग्रजी विभागातील संशोधक - वसुंधरा शिवाजी शितोळे-भोसले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे.

वसुंधरा शितोळे-भोसले यांनी मानव्यविज्ञान शाखेच्या इंग्रजी विषयात 'Quest for Identity and Racial Discrimination in the Autobiographies of Maya Angelou : A Select Study' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. त्यांच्या या संशोधनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या डॉ. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पीएच. डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. योगिनी मुळे, डॉ. अरुण मगर, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अजय ढवळे, केंद्र समन्वयक - डॉ. सुशिल देशमुख, प्रबंधक - अभिनंदन शहा, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या या यशाबद्दल मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांनीही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. डॉ. वसुंधरा शितोळे-भोसले यांच्या या उल्लेखनीय संशोधनामुळे इंग्रजी साहित्यविषयक समीक्षेत नव्या दृष्टिकोनाची भर पडली आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि संशोधन कार्यासाठी त्यांना समाजातील विविध स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.




# एक होतं माळीण' रिव्ह्यू : डोळे पाणावतील, मन सुन्न होईल

■ पुणे (दै. संध्या)

२०१४ मध्ये माळीण गावावर कोसळलेल्या भीषण दरडीने संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले होते. त्या काळजाला चिरणाऱ्या घटनेचा वेदनादायी प्रवास आता निर्माते संतोष जगन्नाथ म्हात्रे यांच्या 'एक होतं माळीण' या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर अनुभवायला मिळतो. हा केवळ एका दुर्घटनेवर आधारित सिनेमा नाही, तर माणुसकी, निसर्ग आणि जगण्याच्या संघर्षाची हृदयाला भिडणारी कहाणी आहे.

चित्रपटाची सुरुवात माळीण गावातील साध्या, शांत आणि आनंदी जीवनापासून होते. गावकऱ्यांचे एकमेकांवरील प्रेम, निसर्गाशी असलेले नाते आणि छोट्या-छोट्या स्वप्नांनी भरलेले आयुष्य इतक्या वास्तववादी पद्धतीने दाखवले आहे की काही मिनिटांतच प्रेक्षक त्या गावाशी भावनिकरित्या जोडला जातो. त्यामुळे पुढे घडणारी दुर्घटना अधिक अस्वस्थ करून जाते. निर्माते संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या संवेदनशील विषयाची निवड करताना कोणत्याही प्रकारचा अनावश्यक नाट्यपूर्णपणा न आणता सत्यघटनेचा भावनिक आणि प्रामाणिक प्रवास पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित राहत नाही, तर तो एका सामाजिक दस्तऐवजाचे रूप धारण करतो. या चित्रपटाची सर्वात मोठी ताकद म्हणजे दरड कोसळण्याचा प्रसंग. कोणताही अनावश्यक गाजावाजा किंवा कृत्रिम व्हिज्युअल्स न वापरता तो इतका वास्तववादी दाखवण्यात आला आहे की काही क्षण चित्रपटगृहात पूर्ण शांतता पसरते. पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक किंकाळीसोबत प्रेक्षकाच्याही मनात अस्वस्थता निर्माण होते. अश्विनी कासार, प्रशांत मोहिते, अक्षय म्हात्रे, अभिजित श्वेतचंद्र, अनिल नगरकर, सिद्धी पाटणे, दीपज्योती नाईक, अनुज ठाकरे





आणि इतर कलाकारांनी आपल्या भूमिका अत्यंत नैसर्गिकपणे साकारल्या आहेत. अभिनय कुठेही कृत्रिम वाटत नाही. प्रत्येक पात्रातील वेदना, असहाय्यता आणि पुन्हा उभं राहण्याची जिद्द मनाला स्पर्श करून जाते. छायांकन हा चित्रपटाचा आणखी एक मजबूत पैलू आहे. दुर्घटनेपूर्वीचे हिरवेगार माळीण आणि त्यानंतरचे उद्ध्वस्त वास्तव यातील विरोधाभास प्रभावीपणे टिपण्यात आला आहे. पार्श्वसंगीतही प्रसंगांना अधिक भावनिक बनवते, मात्र ते कधीही कथेला झाकोळत नाही. प्रेक्षकांच्या दृष्टीने हा चित्रपट का पाहावा? कारण हा चित्रपट केवळ अश्रू ढाळायला लावत नाही, तर विचारही करायला भाग पाडतो. निसर्गाशी छेडछाड, विकासाचे बदलते स्वरूप, आपत्ती व्यवस्थापनाची गरज आणि संकटाच्या काळात माणुसकी किती महत्त्वाची असते, याची जाणीव तो शांतपणे करून देतो. आजच्या ओटीटीच्या काळातही निर्माते संतोष जगन्नाथ म्हात्रे यांचा 'एक होतं माळीण' हा चित्रपट मोठ्या पडद्यावरच अनुभवावा असा आहे. चित्रपट संपल्यानंतर टाळ्यांचा गजर करण्याऐवजी काही क्षण शांत बसून विचार करावा वाटतो, हीच त्याची खरी ताकद आहे. एकूणच, निर्माते संतोष जगन्नाथ म्हात्रे यांची निर्मिती असलेला एक होतं माळीण' हा केवळ एक चित्रपट नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील एका काळ्याकुट्ट अध्यायाचा जिवंत दस्तऐवज आहे.

माणुसकी, संघर्ष, आशा आणि निसर्गाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारा हा भावस्पर्शी सिनेमॅटिक अनुभव प्रत्येकाने एकदा तरी मोठ्या पडद्यावर अनुभवावा, असा चित्रपट म्हणून तो प्रेक्षकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवतो. जर तुम्हाला वास्तवावर आधारित, मनाला भिडणारे आणि चित्रपट संपल्यानंतरही बराच वेळ विचार करायला लावणारे सिनेमे आवडत असतील, तर एक होतं माळीण' तुमच्या पाहण्याच्या यादीत नक्की असायला हवा.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# ३४ हजार ७३२ कोटींच्या विकास आराखड्याला गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना : कुंभमेळ्याच्या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही; विभागांनी जबाबदारीने काम करा

■ मुंबई (दै. संध्या)

नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तारीख निश्चित असून, सर्व विभागांनी विकास आराखड्यातील कामे नियोजित वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत. कामे पुढे ढकलण्याची वृत्ती दूर करुन कुंभमेळ्याच्या ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यातील कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, सरोज अहिरे, हिरामण खोसकर, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याची कुंभमेळ्यातील कामांची परिस्थिती समाधानकारक नसून प्रत्येक विभागाने अधिक वेगाने आणि समन्वयाने काम करण्याची गरज आहे. बैठकीत देण्यात आलेल्या सर्व सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी. एक महिन्यानंतर पुन्हा आढावा बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीपर्यंत



कामामध्ये गुणात्मक आणि प्रत्यक्ष प्रगती दिसली पाहिजे. त्यामुळे पुढील बैठकीची तयारी आजपासूनच सुरू करावी. मुख्यमंत्री म्हणाले की, विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे कोणतेही काम रखडता कामा नये. सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम करून कुंभमेळ्याची तयारी वेळेत पूर्ण करावी. नाशिक महानगरपालिका आयुक्तांनी नाशिकमधील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची आणि रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी गती देण्याचे निर्देश दिले. निर्धारित वेळेत कामे न करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करावी. विकास कामांचा नागरिकांना त्रास होऊ नये, याची खबरदारी यंत्रणांनी घ्यावी. महानगर गॅस कंपनीने गॅस जोडणीच्या कामांसाठी नाशिक महानगरपालिकेशी समन्वय साधून प्रलंबित गॅस कनेक्शनची कामे तातडीने पूर्ण करावीत. सिंहस्थ कुंभमेळा हा राज्याच्या प्रतिष्ठेचा विषय असून, सर्व विभागांनी वेळबद्ध नियोजन, परस्पर समन्वय आणि जबाबदारीची जाणीव ठेवून काम करावे तसेच कुंभमेळ्याची तयारी वेळेत पूर्ण होईल यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीत १२ कोटी भाविकांच्या सुरक्षित व सुलभ दर्शनासाठी वाहतूक, निवास, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन आणि डिजिटल सुविधा याबाबत सविस्तर नियोजन सादर करण्यात आले, त्याबाबत ते म्हणाले, नाशिक रिंग रोड, साधुग्राम उभारणी, रेल्वे स्थानकांचा विकास, ४,५०० विशेष एसटी बसेस तसेच विस्तृत पार्किंग व्यवस्थेची कामे गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'डिजिटल कुंभ' संकल्पनेअंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, 'कुंभदूत' एआय सहाय्यक, डिजिटल ट्विन, स्मार्ट पार्किंग, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, तसेच एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या माध्यमातून गर्दी आणि सुरक्षा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचे निर्देश दिले.

■ कुंभमेळा स्वच्छ, हरित आणि प्लास्टिकमुक्त करण्यासाठी हजारो तात्पुरती शौचालये, कचराकुंड्या, बदल खोल्या आणि मोठ्या प्रमाणात स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.

■ आपत्ती व्यवस्थापनासाठी विशेष पथके, स्वयंसेवक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही करण्यात येणार आहे. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत असून हजारो युवकांना पर्यटन, आदरातिथ्य, आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

■ तसेच सूक्ष्म उद्योजकांना व्यवसाय वृद्धीसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

■ मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी भूसंपादन, रिंग रोड, साधुग्राम आणि इतर महत्वाच्या नागरी सुविधा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करून एप्रिल २०२७ मध्ये प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध करण्याचे निर्देश दिले.

■ केंद्र व राज्य शासन, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम करून सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित, भव्य आणि भाविकांसाठी संस्मरणीय करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## १७५ कोटी ७८ लक्ष रुपये सीडीसीसी बँकेला प्राप्त

चंद्रपूर : महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी 2 जून 2026 च्या शासन निर्णयाद्वारे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना -2026' सुरू केली आहे. या योजनेसाठी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला (सीडीसीसी) 36 हजार 757 पात्र शेतकऱ्यांची यादी प्राप्त झाली होती. त्यापैकी शुक्रवारी (दि.7) सीडीसीसी बँकेच्या 23 हजार 508 शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचे 175 कोटी 78 लक्ष 55 हजार 144 रुपये बँकेला प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पहिल्या टप्प्यात राज्यातील 6 कोटी 22 लक्ष पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची 5 हजार 29 कोटी रुपयांची रक्कम बँकांना वितरीत केली. यात चंद्रपूर जिल्ह्यातील सीडीसीसी बँकेच्या 23 हजार 508 शेतकऱ्यांचा समावेश आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना, चालू खरीप हंगामात शेती कामांसाठी आर्थिक अडचण भासू नये, यासाठी तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश बँकांना देण्यात आले आहेत. त्यामुळे कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आवश्यक आर्थिक बळ मिळणार आहे. विशेष म्हणजे या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया डिजीटल आणि पारदर्शक पध्दतीने करण्यात येत आहे. शासनाने निश्चित केलेल्या मुदतीत आवश्यक अटी व प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असल्याने शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, अॅग्रीस्टॅक नोंदणी तात्काळ करून करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळील सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी) किंवा सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केले आहे. ऑनलाईन तक्रार होत नसल्यास, संबंधित तालुक्याचे सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे शेतकरी लेखी स्वरुपात ऑफलाईन तक्रार दाखल करू शकतात, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जयसिंग ठाकूर यांनी कळविले आहे.

## कायदेशीर ओळखी पलीकडचा बदल !

चंद्रपूर : महाराष्ट्रातील शेतीचा इतिहास लिहायचा झाला तर त्यात महिलांच्या श्रमांची नोंद अपरिहार्य आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, बीजसंवर्धन, भाजीपाला उत्पादन, शेतीमालाची प्रक्रिया अशा जवळपास प्रत्येक टप्प्यावर महिला वर्षानुवर्षे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आल्या आहेत. तरीही "शेतकरी" ही ओळख मात्र बहुतेक वेळा जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव असलेल्या व्यक्तीपुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या लाखो महिलांचे योगदान मान्य असूनही त्यांना कायदेशीर दर्जा, आर्थिक हक्क आणि शासकीय योजनांमध्ये समान प्रवेश मिळत नव्हता. परिणामी पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान आणि इतर अनेक शासकीय योजनांपासून त्या वंचित राहत होत्या. ही दरी भरून काढण्यासाठी राज्य शासनाने "महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६" आणण्याचा निर्णय घेतला आहे. हे विधेयक राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातून राज्य शासनाने शेतीत अहोरात्र काम करणाऱ्या महिलांना एक ओळख दिली आहे. यापुढील काळात कृषी क्षेत्रात यामुळे महिलांचा सहभाग वाढणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेत आणि विधानसभेत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' हे केवळ नवीन कायदेविषयक पाऊल नाही, तर ग्रामीण समाजरचनेतील एका दीर्घकालीन विसंगतीला उत्तर देण्याचा प्रयत्न आहे. महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची ही संकल्पना कृषी क्षेत्रातील लिंगसमतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते. महाराष्ट्राने या विधेयकाच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण दिशा दाखविली आहे. पुढील काळात त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यावर लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल पडणार आहे. त्यांच्या श्रमांना सन्मान, हक्कांना कायदेशीर आधार आणि विकास प्रक्रियेत समान सहभाग मिळवून देण्याची क्षमता या विधेयकात आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' विधानपरिषदेत आणि विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे.

# दिल्ली मराठी चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन

## राजधानीत मराठी चित्रपटांचा नवा अध्याय

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

मराठी चित्रपटसृष्टीला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'दिल्ली मराठी चित्रपट महोत्सव – 2026'चे उद्‌घाटन खासदार विनोद तावडे यांच्या हस्ते आज सायंकाळी शानदार समारंभात झाले. या कार्यक्रमात महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्लीत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाचे उद्‌घाटन झाले.

डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित या उदघाटन सोहळ्यास खासदार तावडे यांच्यासह निवासी आयुक्त श्वेता सिंघल, दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे संस्थापक वैभव डांगे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वित्तीय सल्लागार चित्रलेखा खातू आदी उपस्थित होते.

उद्‌घाटनप्रसंगी बोलताना खा. विनोद तावडे यांनी मराठी साहित्य, नाटक आणि चित्रपटांचा भारतीय चित्रपटसृष्टीवर पडलेला प्रभाव अधोरेखित केला. दिल्लीसह देशभरात मराठी कला, संस्कृती आणि साहित्याबद्दल मोठा आदर असून, मराठी चित्रपट व नाट्यकृतींनी अनेक हिंदी आणि इतर भारतीय भाषांतील चित्रपटांना प्रेरणा दिल्याचे त्यांनी सांगितले.

'रायगडाला जेव्हा जाग येते', 'पाठलाग', 'कुंकू', 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'नटसम्राट', 'अशी ही बनवाबनवी', 'फेकाफेकी' यांसारख्या मराठी कलाकृतींनी भारतीय चित्रपटसृष्टीला समृद्ध केले असल्याचे सांगून ते म्हणाले, अनेक गाजलेले हिंदी, कन्नड, पंजाबी आणि बंगाली चित्रपट मराठी चित्रपटांच्या कथानकांवरुन निर्माण झाले आहेत. मराठी साहित्य आणि



चित्रपटांमधील सर्जनशीलता, संशोधन, अभिनयातील बारकावे आणि दिग्दर्शनाची परंपरा नव्या पिढीने समजून घेतली पाहिजे, असे सांगताना त्यांनी लता मंगेशकर, विजयाबाई मेहता आणि शांता शेळके यांच्या आठवणींना उजाळा दिला. उत्कृष्ट कलाकृती घडविण्यामागील समर्पण, शिस्त आणि सूक्ष्म निरीक्षण यामुळेच मराठी कला अजरामर ठरल्याचे त्यांनी नमूद केले. दिल्लीत सुरू झालेला हा चित्रपट महोत्सव भविष्यात मराठी नाट्य महोत्सवापर्यंत विस्तारला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळ स्थापन करण्यामागची भूमिका विषद केली. त्या म्हणाल्या, मराठी चित्रपट केवळ मनोरंजन करत नाहीत, तर प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतात. महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि मराठी भाषेचा परिचय दिल्लीतील मराठी तसेच इतर भाषिक नागरिकांना करून देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. त्या पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र सदनामध्ये नियमित मराठी चित्रपटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असून, कार्यालयीन वेळेनंतरही नागरिकांना उत्कृष्ट मराठी चित्रपटांचा आस्वाद घेता येईल. दिल्लीतील महाराष्ट्र सदनामध्ये दादासाहेब फाळके मराठी चित्रपट रसास्वाद मंडळ सुरू होणे हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी अभिमानाचा क्षण असून, महाराष्ट्र आणि दिल्ली यांच्यातील सांस्कृतिक सेतू अधिक मजबूत करणारी ही नवी सुरुवात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या चित्रनगरीचा इतिहास, मराठी चित्रपटसृष्टीतील तिचे योगदान आणि भविष्यातील वाटचाल याविषयी सविस्तर माहिती दिली. दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे संस्थापक वैभव डांगे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, राजधानीत प्रथमच आयोजित करण्यात आलेला दिल्ली मराठी चित्रपट महोत्सव हा मराठी चित्रपटसृष्टीला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणारा ऐतिहासिक उपक्रम ठरणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ आणि निर्मात्यांचे भारतीय चित्रपटविश्वातील योगदान उल्लेखनीय असून, दिल्लीतील मराठी बांधवांना एकत्र आणत मराठी संस्कृतीचा वारसा जपण्याचे कार्य दिल्ली मराठी प्रतिष्ठान सातत्याने करत आहे. या पुढील काळात प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठी चित्रपटासाठी एक हक्काचे व्यासपीठ निर्माण केले जाईल.

# सांगलीतील 21,725 शेतकऱ्यांची 156.54 कोटींची कर्जमुक्ती

■ सांगली (दै. संध्या)

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' अंतर्गत सांगली जिल्ह्यातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्याचा शुभारंभ आज डिजिटल पद्धतीने करण्यात आला. यामध्ये सांगली जिल्ह्यातील 21 हजार 725 लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण 156.54 कोटी रुपये कर्जमुक्तीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली तसेच संबंधित अधिकारी ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. सांगली जिल्ह्यात सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या 19 हजार 726 लाभार्थ्यांच्या खात्यावर 132.85 कोटी रुपये, तर राष्ट्रीयकृत बँकांच्या 1 हजार 999 लाभार्थ्यांच्या खात्यावर 23.69 कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील 68 हजार 981 पात्र कर्जखाती शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची 56 हजार 962, तर राष्ट्रीयकृत बँकांची 12 हजार 19 कर्जखाती आहेत.

# प्रत्येक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार : मुख्यमंत्री

■ मुंबई, (दै. संध्या)

राज्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार असून, शेतकरी सक्षम, शेती समृद्ध आणि महाराष्ट्र अधिक प्रगत करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, योजनेच्या पहिल्या टप्प्यात ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन हस्तांतरित करण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे तसेच सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते. तसेच सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि सहकारी संस्थांचे निबंधक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# फळबाग लागवडीतून शेतकऱ्यांचे शाश्वत उत्पन्न वाढवा : भरत गोगावले

■ रायगड (दै. संध्या)

पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवडीसारख्या शाश्वत पर्यायांचा स्वीकार केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न निश्चितपणे वाढू शकते. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक शेतकऱ्यांनी आंबा, काजू यांसारख्या फळपिकांची लागवड करावी. कृषी व फलोत्पादन विभाग शेतकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल, असे प्रतिपादन रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी केले.

मौजे विन्हेरे येथे किशोर नारायण फाळके यांच्या शेतावर 'मागेल त्याला काजू' योजनेअंतर्गत 0.20 हेक्टर क्षेत्रावर सीआरए तंत्रज्ञानाचा वापर करून काजू लागवडीचा, तर मौजे नातोंडी येथे ज्ञानेश्वर सोनकर यांच्या शेतावर व्हीजीबी-आरएएमजी योजनेअंतर्गत 0.25 हेक्टर क्षेत्रावर



आंबा घन लागवडीचा शुभारंभ रोजगार हमी मंत्री श्री. गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य नीलेश ताठरे कार्यकर्ते उपस्थित होते.

## उत्पन्नाचे शाश्वत स्रोत निर्माण करावेत

यावेळी मंत्री श्री. गोगावले म्हणाले की, अनेक ठिकाणी शेती पडिक राहत असल्याचे दिसून येत आहे. अशा जमिनीवर फळबाग लागवड करून शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे शाश्वत स्रोत निर्माण करावेत. व्हीजीबी-आरएएमजी योजनेअंतर्गत आंबा घन लागवडीसाठी 100 झाडांपर्यंत सुमारे 70 हजार रुपयांचे अनुदान तीन वर्षांच्या कालावधीत दिले जात आहे. या योजनेचा लाभ घेऊन अधिकाधिक शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने फळबाग विकसित करावी. कृषी विभाग, फलोत्पादन विभाग आणि संबंधित सर्व यंत्रणा शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनासह आवश्यक ते सर्व सहकार्य करतील, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, शासनाची 'मागेल त्याला काजू' ही योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. काजू हे दीर्घकाळ शाश्वत उत्पन्न देणारे पीक असून त्याचे नुकसान जनावरांकडून तुलनेने कमी होते. समिती सदस्य श्री. खिडबिडे, श्रीमती म. माने, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. खटकळे, तहसीलदार श्री. शितोळे, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गतही शासनाकडून अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन काजू लागवड करावी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे. फळबाग लागवड ही भविष्यातील शेतीसाठी महत्त्वाची दिशा असून या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिष्यवृत्ती परीक्षा ह्या स्पर्धा परीक्षांचा पाया- विजय दादा कोलते

**सासवड : दैनिक संध्या**

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे विद्यालय पिंपळे या विद्यालयात सन 2025/ 2026 या शैक्षणिक वर्षात झालेल्या विविध शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये पात्र झालेल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. शिष्यवृत्ती परीक्षा या सर्व स्पर्धा परीक्षांचा पाया आहे.म्हणून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व विद्यालयातून मोठ्या संख्येने मुलांना स्पर्धा परीक्षेत सहभागी होण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहित करावे असे आवाहन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय दादा कोलते यांनी केले. ते पुढे म्हणाले की आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदर या संस्थेच्या चार विद्यालयांचा विविध स्पर्धा परीक्षा मधून सुमारे 53 विद्यार्थी पात्र आहेत ही गौरवपूर्ण बाब आहे असे ते म्हणाले. प्रमुख उपस्थितांमध्ये श्री शांताराम बापू पोमण, (सचिव) श्री बंडू काका जगताप( सहसचिव) श्री संदीप टिळेकर( सहसचिव) उपस्थित होते. ग्रामस्थांमधून पिंपळे गावचे मा. सरपंच उज्वला ताई पोमण यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संदीप टिळेकर यांनी दहावी बारावीनंतरच्या वाटा या विषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा यशोगाथा पुस्तक देऊन गुण गौरव करण्यात आला.पात्र विद्यार्थ्यांमधून वैष्णवी पोमण,स्नेहल पोमण, सोहम म्हेत्रे, आकांक्षा खेनट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी समस्त ग्रामस्थ पिंपळे नगर ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक रमेश जाधव, सूत्रसंचालन शहाजी पोमण, तर आभार शरद चौधरी यांनी मानले.

### बारामती आरटीओकडून बेवारस वाहनधारकांना अंतिम इशारा

**बारामती : दैनिक संध्या**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरासह इंदापूर, दौंड एस टी डेपो परिसरात व इतर ठिकाणी दीर्घकाळापासून जप्त व बेवारस अवस्थेत उभी असलेल्या वाहनांबाबत वाहन मालक, चालक व वित्तदात्यांना अंतिम सूचना देण्यात येत असून संबंधितांनी १० दिवसांच्या आत वाहने ताब्यात न घेतल्यास, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीने ती बेवारस वाहने समजून त्यांचा जाहीर लिलाव करण्यात येईल. वाहन कर व इतर थकबाकी वसुलीच्या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेली तसेच अनेक महिन्यांपासून कार्यालयाच्या आवारात उभी असलेली सुमारे १५० वाहने अद्याप संबंधितांनी ताब्यात घेतलेली नाहीत. या वाहनांबाबत वाहन मालक, चालक किंवा वित्तदात्यांनी तातडीने कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक कर व शुल्क भरून वाहने ताब्यात घ्यावीत. दीर्घकाळ एकाच ठिकाणी उभी राहिल्यामुळे वाहनांचे नुकसान होण्याची, त्यांची किंमत कमी होण्याची तसेच इंधन गळतीसारख्या कारणांमुळे अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे लिलाव करण्यात येणार असून लिलावातून मिळणारी रक्कम शासन जमा करण्यात येणार आहे. वाहनांच्या जाहीर लिलावाबाबतची तारीख, वेळ व ठिकाणाची माहिती cauction.gov.in तसेच www.mstcecommerce.com या संकेतस्थळांवर आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी कळविले आहे.

### वडगाव कांदळीतील कलाकेंद्रावर गोळीबार

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील कांदळी ग्रामपंचायत हद्दीतील पुणे नाशिक महामार्गालगत असलेल्या तुळजाभवानी कला केंद्रावर चाकण येथील तरुणाने गोळीबार केल्याने ओतुर येथील फिरोज कादिर शेख वय 31 हा तरुण जखमी झाला असून जखमीला आळेफाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. ही घटना पहाटे चार वाजण्याच्या सुमारास घडली. घटनास्थळी नारायणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी दाखल झाले असून घटनेची अधिक माहिती घेत आहेत.चाकण येथील चार तरुण कला केंद्रावर आले होते. या तरुणांनी मद्यपान केले असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. महिलांची बैठक लावण्यावरून पहाटेच्या सुमारास वाद झाला. त्यानंतर या तरुणांना स्थानिक कामगारांनी बाहेर काढले. कला केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ चाकण येथील चार तरुणांपैकी एका तरुणाने पिस्तुलमधून जमिनीवर गोळीबार केला. त्यापैकी एक गोळी घटनास्थळी उभे असलेल्या ओतूर येथील तरुणाच्या कमरेला घासून गेली. याबाबतची माहिती पोलिसांना समजल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील,नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. जखमी तरुणाला आळेफाटा येथे खाजगी रुग्णालय दाखल करण्यात आले आहे. गोळीबार करणाऱ्या चाकण येथील तरुणांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक चाकण येथे पाठवण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस करत असून घटनेची माहिती घेत आहेत. येथील कला केंद्रावर नेहमीच वाद होत असतात. शासनाने दिलेले नियम धाब्यावर बसवून कला केंद्र उशिरापर्यंत सुरू असल्याची माहिती येथील स्थानिक नागरिक देत आहेत.

# नीरेत एटीएम फसवणुकीची मालिका; भामटे मोकाट

## सुरक्षा यंत्रणा मात्र सुस्त : आठवडाभरात दुसरी घटना; एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने ४० हजारांचा गंडा

**बँक आणि पोलिसांकडे तक्रारीसाठी नागरिकांची फरफट; एटीएम सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह**

■ नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा शहरात एटीएम फसवणुकीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आठवडाभरात एटीएम फसवणुकीची दुसरी घटना समोर आली असून, गुरुवारी राख येथील मेंढपाळ व्यावसायिक अण्णा महानवर यांची तब्बल ४० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने अनोळखी व्यक्तीने महानवर यांचा विश्वास संपादन केला आणि काही वेळातच त्यांच्या खात्यातून पैसे काढून पोबारा केला. विशेष म्हणजे, याच आठवड्यात पिंगोरी येथील एका शेतकऱ्याचे एसबीआयच्या एटीएममध्ये कार्ड बदलून सुमारे ३० हजार रुपये लंपास करण्यात आले होते. त्या घटनेनंतर काही दिवसांतच पुन्हा अशाच पद्धतीची घटना घडल्याने नीरा शहरातील एटीएम केंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गुरुवारी अण्णा महानवर पैसे काढण्यासाठी महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये गेले होते. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने "मी मदत करतो" असे सांगत त्यांचा विश्वास संपादन केला. एटीएम व्यवहारादरम्यान त्याने काहीतरी हातचलाखी करून महानवर यांच्या खात्यातून तब्बल ४० हजार रुपये काढल्याचा आरोप आहे. व्यवहार झाल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महानवर यांनी तातडीने शेजारील बँकेत धाव घेतली. मात्र, अपेक्षित तत्परता मिळाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. फसवणुकीची माहिती मिळताच महानवर यांनी नीरा पोलिस ठाण्यात धाव घेतली. मात्र, तक्रार नोंदवण्यासाठी त्यांना विविध ठिकाणी पाठवण्यात आल्याने त्यांची मोठी फरफट झाल्याचे त्यांनी सांगितले. अखेर शुक्रवारी त्यांनी लेखी अर्ज देऊन तक्रार नोंदवली.

फसवणुकीनंतर पैसे वाचवण्यासाठी तातडीची धावपळ करणाऱ्या नागरिकाला बँक आणि पोलिस यंत्रणेकडून तत्पर मदत मिळते का? हा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाला आहे.

नीरा शहरात एटीएमच्या माध्यमातून वारंवार नागरिकांना लक्ष्य केले जात असल्याने एटीएम केंद्रांवर सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियमित निरीक्षण आणि संशयास्पद व्यवहारांवर तातडीची



कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. एटीएममध्ये नागरिकांना मदतीच्या बहाण्याने गाठणारे भामटे सक्रिय असताना सुरक्षा यंत्रणा नेमकी काय करत आहे? एटीएम केंद्रे नागरिकांच्या सुरक्षित व्यवहारासाठी आहेत की भामट्यांसाठी मोकळे कुरण? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना एटीएममध्ये अनोळखी व्यक्तीची मदत घेऊ नये, एटीएम कार्ड आणि पिन कोणालाही देऊ नये, तसेच संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.

## म्हाडाच्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना तातडीने गती द्या : उपमुख्यमंत्री

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) स्तरावरील सर्व प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. शासन स्तरावरील आवश्यक प्रशासकीय मान्यता आणि निर्णय प्रक्रियेलाही गती देऊन सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या बैठकीत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांचा आणि धोरणात्मक विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,



सांगली जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष हे दूरदृश्य प्रणालीद्वारे, तसेच म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे आणि पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाची मोठी घरांची लॉटरी लवकरात लवकर जाहीर करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी.

## खंडागळे अध्यासनच्यावतीने स्कूल बॅग व साहित्यांचे वाटप

■ जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी येथील कै सुधाकर वामन खंडागळे अध्यासन व डॉ प्रसाद खंडागळे मित्र परिवाराच्या वतीने जेजुरी व परिसरातील जिल्हा परिषद शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

जेजुरी येथील जिल्हा परिषद जननी प्राथमिक शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद शाळा क्र 1,मुलींची जननी शाळा जेजुरी, जुनी जेजुरी शाळा व रेल्वे स्टेशन शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

श्री खंडोबा देवाचे अभ्यासक, ग्रंथकार व माजी शिक्षक कै सुधाकर खंडागळे गुरुजी यांच्या स्मरणार्थ दरवर्षी विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते.

डॉ प्रसाद खंडागळे मित्र परिवाराच्या वतीने जिल्ह्यातील अनेक शाळांना अवकाश निरीक्षण प्रयोग शाळा, शौचालये, संगणक, शालेय साहित्य, तसेच जेजुरी



येथील लोककलावंत, वाघ्या मुरुळी, यांना आर्थिक मदत, दिवाळीत गरजू कुटुंबांना दिवाळी साहित्य, कलावंतांची जन्मभूमी असणाऱ्या जेजुरी नागरिक शालेय मुलांच्या कला गुणांना संधी देण्यासाठी मल्हार महोत्सव , राम नवमी निमित्त नारदीय कीर्तन सेवा आदी उपक्रमांचे आयोजन केले जाते. आत्ता पर्यंत तीन कोटी रुपयांहून अधिक सामाजिक हिताची कामे करण्यात आली असल्याचे यावेळी डॉ प्रसाद खंडागळे यांनी सांगितले. यावेळी आयोजित कार्यक्रमावेळी हभप सयाजी महाराज मोहरकर, जेजुरी सेवा केंद्राचे डॉ नितीन केंजळे, प्रकाश खाडे, जेजुरी देवस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, तसेच कुंडलिक भोसले, पुष्कर खाडे, चैत्यन खाडे आदी उपस्थित होते. यावेळी जेजुरी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका विजया कुंजीर, मुख्याध्यापक रवींद्र हिंगणे, नवनाथ वाल्हेकर, स्वाती बारभाई, स्वाती जगताप, प्रणाली कदम, शिवाजी शितोळे तसेच पालक उपस्थित होते.

## प्रगत तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व कार्यक्षमता वाढविण्यावर भर हवा : माजी मंत्री जयंत पाटील

■ दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीज् असोसिएशनचे ७१ वे वार्षिक अधिवेशन

■ पुणे (दै. संध्या)

"साखर उद्योगाकडे केवळ साखर उत्पादन करणारा उद्योग म्हणून न पाहता 'मल्टीप्रॉडक्ट बायोमास रिसोर्स' म्हणून पाहण्याची गरज आहे. इथेनॉल, बायोगॅस, बायो-सीएनजी यांसह विविध मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून उद्योगाची आर्थिक व्यवहार्यता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि कार्यक्षमता वाढविण्यावर मोठ्या प्रमाणात भर द्यावा लागेल," असे प्रतिपादन राज्याचे माजी गृह व अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केले. साखर उद्योग हे एक मोठे कुटुंब असून, या उद्योगाच्या प्रगतीमध्ये 'डीएसटीए'चे तंत्रज्ञान, संशोधन आणि मार्गदर्शन करण्यात महत्त्वाचे योगदान राहिले आहे, असे पाटील यांनी नमूद केले.



दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीज् असोसिएशनच्या (डीएसटीए) ७१व्या वार्षिक अधिवेशनात, तसेच साखर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी जयंत पाटील बोलत होते. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियटमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी माजी मंत्री राजेश टोपे व दिलीप देशमुख, राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, माजी आयएएस अधिकारी डॉ. शेखर गायकवाड, कर्नाटकचे माजी मंत्री श्रीमंत पाटील, दी वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, दी साऊथ इंडियन शुगरकेन अँड शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष आर. व्ही. कुंभार, 'डीएसटीए'चे अध्यक्ष सोहन शिरगावकर, महाराष्ट्र उपाध्यक्ष एस. डी. बोखारे, गुजरात उपाध्यक्ष मानसिंग पटेल, कर्नाटक उपाध्यक्ष सी. जी. माने, एस. एस. इंजिनिअर्सचे चेअरमन एस. बी. भड, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट्सचे महासंचालक संभाजी कडू पाटील, श्री दत्त सहकारी कारखान्याचे संचालक गणपतराव पाटील, कृष्णा समूहाचे प्रमुख डॉ. सुरेश भोसले आदी उपस्थित होते.

अधिवेशनात साखर उद्योगातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी मान्यवरांचा गौरव करण्यात आला. साखर उद्योग गौरव पुरस्कार एस. एस. इंजिनिअर्सचे चेअरमन एस. बी. भड, माजी मंत्री राजेश टोपे, गुजरात साखर संघाचे मानसिंहभाई पटेल, डॉ. सुरेश भोसले आणि कर्नाटकचे आमदार श्रीमंत पाटील यांना प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार गोदावरी बायोरिफायनरी लिमिटेड, विलास सहकारी साखर कारखाना, जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड आणि विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना यांना देण्यात आला. इंडस्ट्रीयल एक्सलन्स अवॉर्ड मेरू इंडस्ट्रीजचे शरद गोरे, कॅन बायोसिसच्या संदीपा कानिटकर, केमिकल सिस्टीमचे अनुप केसरवाणी, टीकेआयएल इंडस्ट्रीज आणि स्वजित इंजिनिअरिंगचे अजित चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. टेक्निकल एक्सलन्स अवॉर्ड सुबोध जोशी, प्रमोदकुमार बेलसरे आणि श्रीपाद गंगावती यांना देण्यात आला. नव्वदीच्या पुढील ज्येष्ठ सदस्य पुरस्कार यशवंत घारपुरे, मानसिंगराव जाधव आणि पी. एन. राव यांना प्रदान करण्यात आला. जीवनगौरव पुरस्काराने बालाजी पाबशेटवार, डॉ. स्वेन, रमेश गंगाई, आर. एस. कुलकर्णी आणि आर. बी. माने यांचा गौरव करण्यात आला. डीएसटीए एक्सेप्शनल सर्विस अवॉर्ड एम. आर. कुलकर्णी, एस. बी. देव, जगदीश कुलकर्णी, डॉ. एस. एम. पवार आणि एस. डी. बोरुडे यांना देण्यात आला. बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड एस. एस. हेगाना, राजेंद्र भिलारे, नारायण मेहाना, डॉ. एम. बी. लोंढे, टी. एम. कर्णे आणि आर. बी. पाटील यांना प्रदान करण्यात आला.

# स्वतःचे व्हिजन ठेवा, सद्विवेकाला फॉलो करा!

**तुकाराम मुंढे यांचे 'जेन झी'ला आवाहन; बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग**

> कोणत्याही व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. व्यवस्थेने नियमांनुसार काम केले पाहिजे. अधिकारी येतील-जातील; मात्र व्यवस्था व्यवस्थित चालण्यासाठी उत्तरदायित्व आणि कार्यपद्धतीची संस्कृती विकसित झाली पाहिजे. त्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसमवेत नागरिकांचेही योगदान महत्त्वाचे आहे.
>
> **- तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग**

*'प्रत्येक तरुणाने स्वतःची स्वप्ने, सद्विवेक आणि अंतरात्म्याला 'फॉलो' केले पाहिजे. केवळ प्रवाहासमवेत न वाहता समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत,' अशा प्रेरक शब्दांत अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी 'जेन झी' पिढीला 'बी युवरसेल्फ'चा मंत्र दिला. 'वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे मला त्रास होत नाही. उलट बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग असून, माझ्या जितक्या जास्त बदल्या होतील, तितके अधिक सकारात्मक बदल घडतील,' अशी रोखठोक भूमिकाही त्यांनी मांडली.*

■ पुणे (दै. संध्या)

'पुणे लोकल' आणि 'माय जनसेवक' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'भविष्यवेध - संवाद भविष्याचा' या उपक्रमांतर्गत 'अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखत कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी मुंढे यांची मुलाखत घेतली. तुकाराम मुंढे यांचे वरिष्ठ बंधू अशोक मुंढे, विश्वेश्वर बँकेचे अध्यक्ष सुनील गाडवे, वी फाऊंडेशनच्या शामला देसाई, आम्रपाली चव्हाण, दिनेश कदम आदी उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी आपल्या बालपणापासूनचा खडतर प्रवास, यूपीएससीतील अपयश आणि यश, प्रशासकीय कारकीर्दीतील कठोर निर्णय आणि अन्न सुरक्षेशी संबंधित धोरणांवर मनमोकळे भाष्य केले. 'बीए झाल्यानंतर एमए राज्यशास्त्र प्रवेशासाठी मी पहिल्यांदाच 'लालपरी' एसटीने पुण्यात आलो होतो. शिवाजीनगर बसस्थानकावरून पुणे विद्यापीठात पायी गेलो. प्रवेश मिळत होता, परंतु वसतिगृह उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या सायंकाळी मला निराश होऊन परत जावे लागले. नंतर यूपीएससीच्या तयारीदरम्यान जयकर ग्रंथालय आणि रानडे इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयात अभ्यास केला. मित्राच्या खोलीवर 'पॅरासाईट' म्हणून राहताना ढेकणांमुळे रात्र-रात्र झोप यायची नाही. त्या काळात चायनीज गाड्यांवर मी आयुष्यात पहिल्यांदा चायनीज खाल्ले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'एमए' करताना परिस्थितीमुळे ऑम्लेट-पाव आणि फरसाण-केळी हेच 'स्टेपल डाएट' होते. आता मी ते 'स्ट्रीटफूड' खाल्ले तर माझा घसा बसेल,' अशी आठवण सांगताच सभागृहात एकच हशा पिकला.

यूपीएससीच्या खडतर प्रवासाबाबत सांगताना ते म्हणाले, 'फक्त यशाकडे पाहू




नका, त्यामागील संघर्षाकडेही पाहा. मला दोन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अपयश आले. तरीही खचून न जाता 'पीएचडी' सुरू केली, नेट परीक्षा उत्तीर्ण झालो, कॉलेजमध्ये तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून काम केले, 'एमपीएससी' परीक्षेत उत्तीर्ण झालो. त्यानंतरही 'यूपीएससी'ची तयारी सुरूच ठेवली. ११ मे २००५ रोजी मी यशदामध्ये विपश्यना करत असताना फोन आला की, 'तुमचे देशात २० व्या रँकने सिलेक्शन झाले आहे.' तो क्षण ऐकून माझा श्वास काही मिनिटांसाठी थांबला होता. या यशामागे मोठा संघर्ष होता.'

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवायांबाबत बोलताना त्यांनी खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून न घेण्याची सडेतोड भूमिका मांडली. 'भेसळयुक्त अन्न, विषारी ताडी-दारू आणि निकृष्ट अन्नपदार्थ नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. 'एफडीए'ने तक्रारींसाठी टोल-फ्री क्रमांक सुरू केला असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हायकोर्टाच्या कँटीनपासून ते शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वत्र नियमानुसारच तपासणी सुरू आहे. अन्न उद्योगाने नियमांचे पालन करणे, एफडीएने नियमन करणे आणि ग्राहकांनी सजग राहणे यातूनच ही व्यवस्था बदलेल.'

तरुणाईला मार्गदर्शन करताना मुंढे म्हणाले, 'कोणाचे अंधानुकरण करू नका, तर प्रत्येकाकडून चांगले गुण शिका आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. डिजिटल युगात तरुण पिढीचा 'अटेंशन स्पॅन' अवघ्या आठ सेकंदाचा झाला आहे आणि स्क्रीन टाइम ८-९ तासांवर गेला आहे. त्यामुळे केवळ सोशल मीडियावर रील्स स्क्रोल करू नका, तर विचार करा. कष्टाची तयारी ठेवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. प्रवाहातील लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे वाहून न जाता जिवंत माणसाप्रमाणे ध्येयाकडे वाटचाल करा. परिस्थिती कशीही असली, तरी तुमचे भविष्य हे तुम्ही आज घेतलेल्या निर्णयांवरच अवलंबून असते.'

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात अरविंद जगताप यांनी तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय प्रवासावर आणि व्यतिमत्त्वावर लिहिलेल्या विशेष पत्राचे भावनिक वाचन केले. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अशोक मुंढे आणि अमित रुके यांनी मनोगत व्यक्त केले. विरेश आंधळकर यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले.